145

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी तरुणांनी स्वयंरोजगारांतर्गत स्विकारलेल्या उत्पन्न निर्मितीच्या योजनांसंबंधीचा मूल्यमापन अहवाल

TRTI

MAHARASHTRA STATE PUNE

**आदिवाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१.

१९९६

# प्रस्तावना

रोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र बनत चालला आहे. भारतासारख्या विकसनशील देशातच नव्हे तर विकसित देशातही हा प्रश्न बिकट होत चालला आहे. सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या मिळणे कठीण झालेले आहे. असंख्य युवक पदवीधर होऊन कामाअभावी बेकार होत चालले आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागात सुध्दा या प्रश्नाची तीव्रता अधिक जाणवू लागली आहे. बेरोजगारीच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी शासन स्वयंरोजगाराच्या विविध योजना राबवित आहे. बँकादेखील व्यवसायास/उद्योगांना कर्ज पुरवठा करुन हा प्रश्न सोडविण्यास हातभार लावीत आहेत. ग्रामीण भागात जास्तीत जास्त स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी शासन बव्हंशी लघुउद्योग, छोटे उद्योग, ग्रामीण उद्योग व कुटीरोद्योगांची निर्मिती करुन या क्षेत्रांद्वारे स्वयंरोजगाराच्या कक्षा वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेक उद्योग असे आहेत की, ते कमी भांडवलाच्या बळावर सहज सुरु करणे शक्य आहे. तेव्हा सुशिक्षित बेरोजगार युवकांनी केवळ नोकरीच्या मृगजळामागे न लागता उद्योग व्यवसायाकडे वळले पाहिजे. कारण 'स्वयंरोजगार' हाच नोकरीला एकमेव उपयुक्त पर्याय ठरु शकतो.

आदिवासी भागात सुशिक्षित आदिवासी तरुणांच्या संख्येत होणारी वाढ तसेच नोकरीचे मर्यादित झालेले क्षेत्र विचारात घेऊन जास्तीत जास्त आदिवासी तरुणांनी स्वयंरोजगाराकडे वळावे यासाठी शासन अधिकाधिक प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी भागात अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करुन त्याद्वारे आदिवासी तरुणांना तांत्रिक शिक्षण दिले जात आहे. हेतू हाच की, आदिवासी तरुणांनी स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु करुन आर्थिक विकास करावा. तसेच आदिवासी भागात विविध सवलतींच्या स्वयंरोजगाराच्या योजना राबवून त्यामार्फत देखील आदिवासी तरुणांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहीत केले जात आहे. याचा परिणाम म्हणजे आदिवासी सुशिक्षित युवकांना स्वयंरोजगाराचे महत्व पटून उज्वल भवितव्यासाठी ते हळूहळू स्वयंरोजगार सुरु करु लागले आहेत. आदिवासी भागातील भौगोलिक परिस्थिती, तेथील आदिवासी युवकांची आर्थिक स्थिती, त्यांच्या गरजा ह्या गोष्टी लक्षात घेऊन शासनाने आदिवासी भागात ज्या विविध सवलतींच्या स्वयंरोजगाराच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत, त्याचा फायदा घेण्यास प्रवृत्त होऊ लागले आहेत.

प्रस्तुत मूल्यमापन अहवालात जिल्हा उद्योग केंद्र, आदिवासी विकास महामंडळ, (प्रादेशिक कार्यालये) जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालय व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय या कार्यालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या स्वयंरोजगाराच्या योजनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. या स्वयंरोजगाराच्या योजना राबविताना अंमलबजावणी अधिकाऱ्यांना बँक

अधिकाऱ्यांना तसेच आदिवासी तरुणांना येणाऱ्या अडचणी, योजनामधील आदिवासींचा सहभाग, बँकेच्या सहभाग योजनेपासून आदिवासींना झालेला लाभ, इत्यादी बाबींचा उहापोह या मूल्यमापन अहवालात करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर आदिवासी भागातील सुशिक्षित बेरोजगार आदिवासी युवकामध्ये स्वयंरोजगाराचे वाढीस लागलेले महत्व देखील अहवालात उल्लेखिलेले आहे.

हा संशोधन अहवाल तयार करण्याचे काम श्री.एस.आर.साळुंखे, संशोधन सहाय्यक यांनी केले. सौ.मंगल घोडे, संशोधन अधिकारी यांचे देखरेखीखाली अहवालाचे कामकाज करण्यात आले. श्री.डी.एम.रासकर, उपसंचालक यांनी अहवाल तपासून त्यात दुरुस्त्या केल्या. सदर अहवालाचे टंकलेखनाचे व डी.टी.पी.चे काम श्री.के.पी.कुर्डे , लघुटंकलेखक यांनी केले.

प्रस्तुत मूल्यमापन अहवाल स्वयंरोजगाराच्या योजना राबविणाऱ्या संबंधित कार्यालयातील कार्यान्वयन अधिकारी, आदिवासी भागात इतर योजना राबविणारे अधिकारी, आदिवासी विकासात रस असलेल्या व्यक्तींना तसेच संशोधकांना उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.

पुणे

दिनांक-

*(डॉ.नवीनचंद्र जैन)*
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# अ नु क्र म णि का


| अ. क्र. | विषय | | पृष्ठक्रमांक पासून | पृष्ठक्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | प्रास्तविक | | १ | ८ |
| २. | स्वयंरोजगार योजनेअंतर्गत विविध योजनांचा आढावा | | ९ | २१ |
| ३. | मूल्यमापन अहवाल उद्देश व सर्वेक्षण पध्दती | | २२ | २५ |
| ४. | क्षेत्रीय निरीक्षण व सांख्यिकी माहितीचे पृथ:करण | | २६ | ३४ |
| ५. | निष्कर्ष | | ३५ | ४३ |
| ६. | सूचना तथा शिफारशी | | ४४ | ५० |
| ७. | प्रपत्रे | १. *लाभधारकाची माहिती* | | |
| | | २. *योजना राबविणाऱ्या यंत्रणेकरिता* | | |
| | | ३. *बँका/वित्तीय संस्था यांची माहिती* | | |

# प्रकरण क्र. १

## प्रास्ताविक

१.१ प्रामुख्याने ग्रामीण भागातील होतकरु व सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायाचे प्रशिक्षण, मार्गदर्शन देऊन त्याचप्रमाणे व्यवसाय, उद्योगधंदा सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य करुन त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणे ही स्वयंरोजगाराची सर्वसाधारण संकल्पना आहे. अत्यल्प भांडवलामध्ये तसेच खेड्यातल्या गरजेनुसार वस्तुंचा पुरवठा करणारे छोटे छोटे उद्योग सुरु करुन ग्रामीण बेरोजगारांना तेथल्या तेथेच उपजिविकेचे साधन मिळावे हा ग्रामीण स्वयंरोजगारामागील प्रमुख उद्देश आहे.

ग्रामीण भागातील विशेषत: आदिवासी भागातील आदिवासींचा सर्वांगीण विकास करतांना पहिल्या पाच पंचवार्षिक योजनामध्ये आदिवासी भागामधील रस्ते, दवाखाने, पाणी, वीज, शिक्षण व शेती इ.मूलभूत बाबींना शासनाने प्राधान्य दिल्याने त्यांना पंचवार्षिक योजनात महत्वाचे स्थान मिळाले. तथापि, आदिवासी भागातील ग्रामीण रोजगार व्यवसाय वाढविण्यासाठी शासनाने जे प्रयत्न केलेत त्यात काही ठिकाणी तांत्रिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासल्याने शासनाच्या या प्रयत्नांवर आपोआपच मर्यादा पडल्यात. त्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशिक्षण' हया बाबीस प्राधान्य देऊन शासनाने या समस्येशी सोडवणूक करण्यात बऱ्याच अंशी यश मिळविले. ग्रामीण बेरोजगारीवर मात करण्यासाठी शासन पातळीवर तसे प्रयत्न सुरु आहेत, तसेच प्रयत्न पूर्वीदेखील करण्यात आले होते. स्वांतत्र्यपूर्व काळात सर्वोदय विभागामार्फत आदिवासी भागामध्ये ग्रामीण तसेच कुटीरोद्योग सुरु करण्याचे प्रयत्न झाले होते. परंतू त्यात नियोजनबध्द असे प्रयत्न न झाल्याने त्यात पाहिजे त्या प्रमाणात यश येऊ शकले नाही. या कार्यक्रमांची अंमलबजावणी केवळ सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत करण्यात आली होती. त्यावर पुरेसे शासन नियंत्रण नसल्याने त्या कार्यक्रमांना फारसे यश आले नाही, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

मात्र स्वातंत्र्योत्तर काळात जसजशी ग्राम विकासाची संकल्पना पुढे येत गेली तसतशी ग्राम विकासाच्या दिशेने ग्रामोद्योगाकडे शासनाची पावले पडू लागली. खेड्यापाड्यामध्ये पूर्वापार चालू असलेले बारा बलुतेदार, इतर कलाकुसरीची कामे तसेच काही वंश परंपरागत व्यवसाय हे स्वातंत्र्योत्तर काळात काही ठिकाणी लयास जाण्याच्या मार्गावर होते. हे व्यवसाय लयास न जाता त्याचे पुनरुज्जीवन करणे, त्यांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने त्या दिशेने ठोस पावले उचलण्याचे प्रयत्न शासन स्तरावर सुरु झालेत. नोकरीच्या स्वरुपात सर्वांना रोजगार उपलब्ध करुन देणे फार कठीण असल्याने शासनाने 'स्वयंरोजगाराच्या योजना' प्रभावीपणे राबविण्यावर विशेष भर दिला आहे. त्यासाठी शहरी

भागाबरोबरच ग्रामीण भागावर देखील शासनाने लक्ष केंद्रीत केले आहे. ग्रामीण भागातील छोटे उद्योग, कुटीरोद्योग यांच्या वाढीस चालना देण्याच्या उद्‌देशाने संबंधित शासकीय कार्यालये तसेच वेगवेगळया वित्तीय संस्थामार्फत ग्रामीण व्यवसायधारकांना अनुदान/कर्ज उपलब्ध करुन देऊन ग्रामीण उद्योगांचे शासनाने बळकटीकरण करण्यास सुरवात केली.

छोटे उद्योग (Tiny Industries) ग्रामीण उद्योग तदवतच कुटीरोद्योग हे राज्याच्या ग्रामीण विकासात महत्वाची भूमिका बजावतात. कमी भांडवली खर्चात अधिक रोजगार निर्माण करुन विकास घडवून आणण्यात वरील उद्योगांचा महत्वपूर्ण वाटा आहे. हया उद्योगामधून जनतेच्या गरजांची पूर्तता तर होतेच, परंतू उद्योगधारकाला स्वत:चा आर्थिक विकास साधता येतो. महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्राचा स्वयंरोजगाराच्या दृष्टीकोनातून विचार करता छोटे उद्योग, ग्रामीण उद्योग व कुटीरोद्यागांची व्याप्ती हया भागातून अधिक आढळते. आदिवासी क्षेत्रात देखील वरील व्यवसायांचे प्रमाण अधिक आढळते.

## १.२ स्वयंरोजगार काळाची गरज

आदिवासी समाज हा बहुसंख्य शेती व शेती संलग्न व्यवसायावर अवलंबून असणारा समाज आहे. शैक्षणिकदृष्ट्या आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेने मागे तरच आहेच पण त्यांची आर्थिक परिस्थिाती देखील जेमतेम असते. त्यांच्या उपजिवकेची प्रमुख साधने म्हणजे शेती, जंगले व मजूरी ही होत. परंपरागत शेतीपध्दती व अनियमित स्वरुपाची मजूरी यामुळे आदिवासींना जास्त उत्पन्न मिळत नाही. दिवसेंदविस जंगल क्षेत्र कमी होऊ लागल्याने जंगलातून देखील आता त्यांना फारस लाभ होत नाही. या सर्व गोष्टीमुळे आदिवासी कुटुंब चरितार्थासाठी शहराकडे स्थलांतरीत करण्याची प्रवृत्ती वाढते. या सर्व गोष्टींचा विचार करुन आदिवासींना इतर समाजाच्या बरोबर आणण्यासाठी शासनाने ज्या अनेकविध योजना सुरु केल्या आहेत, त्यापैकी 'शिक्षण' ही एक अत्यंत महत्वाची योजना आहे. आदिवासी पालकांना आपल्या मुलामुलींच्या शिक्षणाचा कोणताही बोजा न पडता, गांवातल्या गांवात राहून त्यांना शिक्षणाचा सहज लाभ व्हावा, त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा या उद्‌देशाने महाराष्ट्र शासनाने सन १९७२-७३ पासून शासकीय आश्रमशाळांची योजना सुरु केली. स्वयंसेवी संस्थांना देखील आदिवासी क्षेत्रात आश्रमशाळा उघडून या योजनेत हिरीरीने भाग घेतला. महाराष्ट्रात आज अनेक शासकीय, अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहे कार्यरत असून आदिवासींची बहुतांश मुले मुली त्यात राहून शिक्षणाचा लाभ घेत आहेत व विकासाच्या प्रवाहात येत आहेत. परंतू ज्या प्रमाणात आदिवासी युवक - युवती शिक्षणाच्या पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत, त्या प्रमाणात त्यांना नोकरीच्या स्वरुपात रोजगार मिळणे अवघड होत चालले आहे. कारण पूर्वी शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांची

संख्या मर्यादित होती. परंतू आता सर्वत्र शिक्षणाचे महत्व वाढीस लागल्याने शिक्षण प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यातच शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांना नोकरीसाठी स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. या स्पर्धा परीक्षांना शहरी भागातील सुशिक्षित तरुण पूर्वतयारीनिशी सामोरे जातात. तथापि, ग्रामीण भागातील दळणवळणाच्या अपूऱ्या सोयी, मर्यादित प्रसार माध्यमे, यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण विशेषतः आदिवासी युवक स्पर्धा परीक्षकांना सामोरे जातातना शहरातील युवकांपेक्षा तुलनेने मागे राहतात. त्याचा परिणाम म्हणजे नोकरीच्या स्वरुपात रोजगारांची संधी न मिळाल्याने बेकारीच्या संख्येत वाढ होत जाते.

शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे शैक्षणिक पात्रताधारकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत चालली असून त्या प्रमाणात त्यांना नोकऱ्या उपलब्ध होत नसल्याने नोंदणी पटावरील प्रतिक्षा कालावधीत देखील दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्या कालावधीत काही उमेदवारांचे वय विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त होत जाते. अशा परिस्थितीत काही उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध होवून देखील त्यांची निवड होऊ शकत नाही. नोकरीच्या स्वरुपात रोजगार मिळणे दिवसेंदिवस बिकट झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे. म्हणूनच असे म्हणता येईल की, सुशिक्षितांची सर्वांगीण उन्नती करावयाची असेल तर त्यांना शैक्षणिक काळात शिक्षणाबरोबरच व्यवसायाचे शिक्षण देवून त्यायोगे त्यांच्यात उद्योगधंद्याची कास धरण्याची प्रवृत्ती वाढवावी. नोकरीच्या स्वरुपात रोजगार मिळणे दुरापास्त होत चालल्यानेच सुशिक्षित युवकांनी स्वयंरोजगाराकडे वळणे अतिशय आवश्यक झाले आहे. सद्य परिस्थितीतील सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येतील वाढीवरील नियंत्रणासाठी स्वयंरोजगार हा एक उपयुक्त पर्याय ठरु शकतो, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**स्वयंरोजगाराची आवड निर्माण व्हावी, जास्तीत जास्त तरुणांनी स्वयंरोजगार सुरु करावा** म्हणून तांत्रिक शिक्षणाची जोड आवश्यक झाली आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होईलच याची शाश्वती नाही व रोजगाराच्या शोधार्थ हे तरुण बाहेरगांवी रोजगारासाठी गेले तरी तेथेही रोजगाराची शाश्वती नसल्याने अशा तरुणांमध्ये वैफल्याची भावना निर्माण होऊ शकते. तांत्रिक शिक्षणाची जोड दिल्याने आदिवासी तरुणांस त्याच्या गांवातच किंवा त्याच्या भागातच स्वयंरोजगार सुरु करता येऊ शकेल व त्यायोगे त्याच्या आर्थिक उन्नतीत वाढ होऊ शकेल. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे विविध व्यवसाय व तांत्रिक शिक्षणाच्या योजना गेल्या काही वर्षात सुरु केल्या गेल्या आहेत. या धोरणाप्रमाणे प्रत्येक जिल्हयामध्ये शासकीय किंवा अनुदानित एक तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)

कार्यान्वित आहे व त्यामध्ये ग्रामीण व आदिवासी युवकांना प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. केवळ आदिवासी क्षेत्राचा विचार करावयाचा झाल्यास आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रामध्ये एकूण १५ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून त्या केवळ आदिवासी युवकांकरिता कार्यान्वित आहेत. याशिवाय संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये तांत्रिक शिक्षणासाठी अनुदानित व विना अनुदानित मिळून ३४८ संस्था कार्यरत आहेत. आदिवासी युवकांना वरिल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध व्यवसायांवर आधारीत प्रशिक्षण दिले जाते.

रोजगारीच्या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी शासन आपल्या परीने या उग्र समस्येवर उपाययोजना करीत आहे. नागरी व ग्रामीण भागातील सर्व बेरोजगार लोकांसाठी स्वयंरोजगार योजनेमध्ये लघु उद्योग, ग्रामीण उद्योग व कुटीर उद्योग इत्यादी उद्योगांचा महत्वपूर्व वाटा आहे. शासकीय नवनवीन स्वयंरोजगार योजनामुळे व्यवसाय रोजगार अधिकच वृध्दींगत होत आहे. नव्या पिढीला याबाबत व्यवस्थित मार्गदर्शन, प्रोत्साहन देऊन त्यात भर टाकली जात आहे. सुशिक्षितांच्या वाढत्या बेकारीच्या पार्श्वभूमीवर तर हे अधिकच महत्वाचे आहे.

स्वयंरोजगाराच्या शासनाने ज्या विविध योजना सुरु केलेल्या आहेत, त्याचा लाभ गरजूंना मिळण्याच्या दृष्टीने विविध संस्था, कार्यालये, स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. जी वेगवेगळी शासकीय कार्यालये, महामंडळे, वित्तीय संस्था या कार्यक्रमात अग्रभागी आहेत, त्यापैकी जिल्हा उद्योग केंद्र, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, राष्ट्रीयकृत बँका, एकात्मिक ग्रामीण विकास महामंडळ, खादी व ग्रामोद्योग मंडळ, आदिवासी विकास महामंडळ, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प इत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील रोजगाराविषयी आढावा घेतल्यास असे दिसते की, महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी १.९९ टक्के म्हणजे १,४५,६३३ एवढे आदिवासी वस्तुनिर्माण प्रक्रीया, संधारण दुरुस्ती, घरगुती उद्योग व घरगुती उद्योगा व्यतिरिक्त इतर उद्योगात गुंतलेले असून ०.९७ टक्के म्हणजेच ७०,९८७ आदिवासी व्यापार व वाणिज्य यात गुंतलेले आहेत. सुमारे ४० ते ५० टक्के आदिवासी हे शेती व शेतीशी संलग्न व्यवसायात गुंतलेले आहेत. सर्वसाधारण आदिवासी लोकांचा कल हा शेती व शेती व्यवसायाशी संलग्न व्यवसाय मजूरी हयाकडे जास्त असतो. परंतू सुशिक्षित आदिवासी युवकांचा /युवतींचा ओढा अंगमेहनतीच्या कामापेक्षा नोकरी मिळविण्याकडे अधिक असतो. नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करुनही नोकरी न मिळाल्यास स्वयंरोजगाराकडे वळण्याचा त्याचा कल हल्ली अधिक वाढीस लागलेला दिसून येतो.

शासनाच्या स्वयंरोजगाराच्या ज्या विविध योजना आहेत, त्या योजनांचा अधिकाधिक लाभ घेऊन कुटुंब चरितार्थाबरोबरच स्वत:चा आर्थिक विकास करुन घेण्यासाठी ते प्रयत्नशील असल्याने सर्वसाधारणपणे निदर्शनास येते. याचाच अर्थ आदिवासी क्षेत्रातही स्वयंरोजगाराचे महत्व दिवसेंदिवस वाढीस लागले आहे, असे म्हणता येईल. आदिवासी क्षेत्रातील स्वयंरोजगाराचे वाढलेले महत्व लक्षात घेता शासनाने ग्रामीण व लघुउद्योगासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेत (१९९२-९७) १७,८४१.०० लाख एवढा नियतव्यय मंजूर केला असून आदिवासी भागातील ग्रामीण व लघु उद्योगासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत रु.२०८.०० लाख एवढा नियतव्यय मंजूर केलेला आहे. एकूण नियतव्ययाशी त्याची टक्केवारी १.१६ एवढी आहे.

स्वयंरोजगाराच्या योजनांपैकी मूल्यमापन अहवालासाठी ज्या योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्याची विस्तृत माहिती पुढील प्रकरणात दिलेली आहे.

# प्रकरण क्र.२

## स्वयंरोजगार योजनेंतर्गत विविध योजनांचा आढावा

बेरोजगार युवकांनी उद्योग व्यवसायाकडे वळण्याच्या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्र, खादी व ग्रामोद्योग मंडळ, आदिवासी विकास महामंडळ व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत स्वयंरोजगाराच्या ज्या विविध योजना राबविल्या जातात, त्या योजनांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### २.१ जिल्हा उद्योग केंद्र

(१) सुशिक्षित बेरोजगारांसाठी 'पंतप्रधान रोजगार योजना' -

*अ. पात्रता-*

१. शिक्षण- एस.एस.सी.पास/नापास/आयटीआय किंवा सरकारमान्य संस्थेचे कमीत कमी सहा महिन्याचे शिक्षण पूर्ण

२. वयोमर्यादा- वय १८ ते ३५ वर्षापर्यंत

३. उत्पन्न - कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२४,०००/- चे आंत

४. वास्तव्य - ज्या भागामध्ये व्यवसाय करावयाचा आहे, त्या ठिकाणी कमीत कमी तीन वर्षे वास्तव्य

*ब. योजनेची वैशिष्ठये-*

१. कर्ज प्रकल्प रु. १ लाखांचे आत असलेल्या व्यापार, सेवा, उद्योग व उद्योगासाठी राष्ट्रीयकृत बँकेमार्फत स्थिर व खेळते भांडवल मिळून संयुक्तिक कर्ज प्रकल्पाच्या ९५ टक्के मिळू शकते.

२. अर्जदाराने स्वत:चे भागभांडवल प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के इतके उभारावे लागते.

३. प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के किंवा रु.७,५००/- जे कमी असेल ते अनुदान म्हणून शासनामार्फत बँकेस परस्पर जमा होते.

४. बँकेच्या कर्जावर प्रचलित दराने व्याज आकारले जाते.

*क. भागीदारीमध्ये व्यवसाय, सेवा उद्योग व उद्योग-*

या योजनेंअंतर्गत एक किंवा अधिक युवक युवती एकत्रित येऊन भागीदारीत व्यवसाय करु शकतात. प्रत्येकास वरील अटी पूर्ण कराव्या लागतील व प्रत्येकी रु.१ लाखापर्यंत कर्ज मिळू शकते.

प्रत्येकी ५ टक्के स्वत:चे भाग भांडवल उभारावे लागते. प्रत्येकास १५ टक्के किंवा रु.७,५००/- जे कमी असेल ते अनुदान मिळते. तथापि, त्यासाठी कर्जाची परतफेड नियमित करणे आवश्यक असते.

## २. सुशिक्षित बेरोजगारांना बीजभांडवल योजनेतील कर्ज

राज्यातील सर्व बेरोजगारांना नोकरीच्या स्वरुपात रोजगार उपलब्ध होणे अशक्य आहे. त्यामुळे बेरोजगारांना आपला स्वत:चा व्यवसाय (व्यापार, सेवा उद्योग, वा उद्योग) याद्वारे स्वयंरोजगार सुरु करता यावा या दृष्टीने ही योजना सुरु करण्यात आली आहे.

बँक किंवा वित्तीय संस्थामार्फत एकूण प्रकल्प अहवालाच्या ७५ टक्के कर्ज दिले जाते. उर्वरित २५ टक्के रक्कम अर्जदाराने स्वत:चे भाग भांडवल म्हणून उभे करावेत, अशी अपेक्षा असते. परंतु २५ टक्के रक्कम उभी करणे बेरोजगारांना शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्यावरील बोजा कमी व्हावा याकरिता बेरोजगारांना बीजभांडवल म्हणून एकूण प्रकल्पाच्या १५ टक्के रक्कम ही दरसाल १० टक्के व्याजाने दिली जाते.

सुशिक्षित बेरोजगारांना बीजभांडवल कर्ज प्रकरणासाठी असलेल्या प्रमुख अटी पुढीलप्रमाणे आहेत-

१. प्रकल्प खर्च रु.१० लाखाचे आत असावा.

२. शैक्षणिक पात्रता- कमीत कमी ७ वी पास/आयटीआय पास तथापि, अनुसूचित जमातीसाठी शिक्षणाची अट नाही.

३. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे

४. वास्तव्य - महाराष्ट्रातील कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य

५. वित्त सहाय्य- रु.१.०० लाखापेक्षा कमी खर्चाचा प्रकल्प असल्यास बँकेचे कर्ज ७५ टक्के बीजभांडवल १५ टक्के अर्जदाराचे स्वत:चे १० टक्के (किंवा) अर्जदार कमी उत्पन्न गटातील (रु.४,८०० चे आत पालकाचे वार्षिक उत्पन्न) किंवा अनुसुचित जाती-जमातीचा असल्यास बँकेचे कर्ज ७५ टक्के बीजभांडवल २० टक्के व स्वत:चे ५ टक्के, अर्जदार अनुसूचित जाती-जमातीचा असून कमी उत्पन्न गटातील असल्यास, बँकेचे कर्ज ७५ टक्के, बीजभांडवल २२.५ टक्के व स्वत:चे २.५ टक्के

६. प्रगती अहवाल रु.१.०० लाखापेक्षा जास्त असल्यास बँकेचे कर्ज ७५ टक्के बीजभांडवल १५ टक्के व स्वत:चे १० टक्के उभारावे लागते.

३. जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना-

ग्रामीण भागात लहान उद्योगांची वाढ व्हावी व ग्रामीण भागातील उद्योजकांना स्वत:चे भांडवल कमीत कमी गुतविण्यास लागावे या दृष्टीने ही योजना फायदेशीर आहे. या योजनेअंतर्गत अति लहान (Tiny Unit) उद्योग ज्यांची यंत्रसामुग्रीतील गुंतवणूक २ लाख रुपयांचे आत आहे व सदरील उद्योग १ लाख किंवा त्यापेक्षा कमी लोकवस्तीच्या शहर/गांवात येत असेल तर त्यांना या योजनेचा लाभ मिळू शकतो. बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या खर्चाच्या २० टक्के व जास्तीत जास्त रु.४०,०००/- कर्ज म्हणून देता येते. याचा व्याजदर ४ टक्के आहे. अनुसुचित जाती-जमातीमधील उमेदवार असल्यास प्रकल्प खर्चाच्या २० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.६०,०००/- पर्यंत कर्ज मिळू शकते. या योजनेमध्ये शिक्षण व वयाची अट नाही. हे कर्ज नवीन सुरु उद्योगास किंवा स्थापित उद्योगांच्या विस्तारासाठी सुध्दा मिळू शकते.

*अर्थसहाय्यासाठी अर्ज करण्याची पध्दत*

१. सुरवातीस अर्जदाराने विहित नमुन्यातील एक पानाच्या (पूर्वसंमतीसाठी) अर्जात माहिती भरुन तो जिल्हा उद्योग केंद्राच्या मार्गदर्शन कक्षावर सादर करावा लागतो.

२. अर्ज सादर करतांना शाळा सोडल्याचा दाखला, शिक्षणाचे प्रमाणपत्र, शिधापत्रिका, सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र आणि वाहतूक व्यवसायाबाबत वाहन चालविण्याचा परवाना, टूरिंग टॅक्सी असल्यास त्याबाबतचा परवाना इ.बाबींची मूळ कागदपत्रे पाहण्यासाठी सादर करावी लागतात.

३. सदरचा अर्ज पूर्व संमतीसाठी अर्जदाराने नमूद केलेल्या संबंधित बँकेच्या शाखेस कार्यालयीन कर्मचाऱ्यामार्फत पाठविण्यात येतो.

४. संबंधित बँक अर्जदारास मुलाखतीसाठी बोलावून त्यानंतर सदरील अर्ज योग्य की अयोग्य ते ठरवते.

५. बँकेने संबंधित अर्ज योग्य ठरवून पूर्व संमती कळविल्यानंतरच अर्जदाराने विहित नमुन्यातील स्वतंत्र अर्ज भरुन त्यासोबत देण्यात आलेल्या यादीप्रमाणे इतर कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती व रु.१० च्या स्टॅम्पपेपरवर विहित नमुन्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र जोडून तो अर्ज मार्गदर्शन कक्षावर सादर करावा लागतो.

६. पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत करण्यात आलेला अर्ज कार्यपथक समितीचे संमतीने संबंधित बँकेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतो. मात्र, इतर योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज कार्यालयामार्फत संबंधित बँकेकडे शिफारस करुन पाठविण्यात येतो.

७. सुशिक्षित बेरोजगारास बीजभांडवल या योजनेअंतर्गत बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर मंजूरीपत्रासह क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्ज व त्यासोबत असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती व मूळ प्रतिज्ञापत्र यांचा एकसंच जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास सादर करावा लागतो.

जिल्हा उद्योग केंद्राकडून बीजभांडवल मंजूरीपत्र मिळाल्यावर विहित नमुन्यातील सेकंड डीड ऑफ हायपोथीकेशन अथवा सेकंड डीड ऑफ मॉर्टगेज संबंधात सब रजिस्टर कार्यालयात दस्तऐवज नोंदविल्याबाबतची पावती व सब रजिस्टार यांनी प्रमाणित केलेली प्रत या कार्यालयास सादर करावी लागते.

८. वरील कागदपत्रांची व त्यातील पध्दतीची पूर्तता झाल्यानंतर बीज भांडवलाचे वाटप करण्यात येते.

(४) उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम

स्वयंरोजगारासाठी होतकरु तरुणांना प्रथम मार्गदर्शन देणे आवश्यक असते. तसेच विविध प्रकारच्या उद्योगधंद्यासाठी लागणारी माहिती उदा.कर्ज कोठे मिळते, अर्ज कसा करावा, अर्जासोबत कोणकोणते प्रमाणपत्र द्यावे लागते. इ.ची माहिती या प्रशिक्षण केंद्रात दिली जाते.

प्रशिक्षण दोन प्रकारचे असते. एक दिवसांचे शिबिर व आठवड्याचे शिबिर

आठवड्याच्या शिबिरासाठी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण काळाकरिता रु.१००/- विद्यावेतन दिले जाते.

## २.२ आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना-

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, मर्यादित, नाशिक यांच्याद्वारे राबविण्यात येणारी आदिवासींच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी 'एकलव्य मिनी ट्रक योजना'

### १. पार्श्वभूमी

या योजनेद्वारे ग्रामीण भागातील अनुसुचित जमातीच्या होतकरु उद्योजक व सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे प्रकल्प उभारण्यास मदत करुन त्यांचा आर्थिक विकास वेगाने घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय अनुसुचित जाती/जमाती वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या

सहाय्याने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, मर्यादित नाशिक यांचेमार्फत हलक्या वजनाची व्यापारी वाहने सवलतीचे व्याज दरातील कर्ज सहाय्याने उपलब्ध करुन देण्यात येतात.

२. एकलव्य मिनी ट्रक योजना - या योजनेची रुपरेषा-

आदिवासी ग्रामीण भागातील मोठ्या मध्यम वा लघु उद्योगांकडे तसेच तेथील शासकीय, निमशासकीय व्यवस्थापनाकडे वाहतूक सेवेचे काम मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. आदिवासी भागातील भौगोलिक परिस्थिती आणि दळणवळणाची व्यवस्था पाहता तेथे हलक्या वजनाची व्यापारी वाहने वाहतूकीसाठी किफायतशीर ठरतात. साहजिकच हा व्यवसाय अंगीकारुन या भागातील स्थानिक होतकरु आदिवासी तरुण आपल्यासाठी उत्पन्नाचे चांगले साधन निर्माण करु शकतात.

बिगर आदिवासी भागाच्या तुलनेत आदिवासी भागातील बँकीग व्यवस्था कमी प्रमाणात विकसित झाल्यामुळे स्थानिक आदिवासींना उत्पन्नाची पुरेशी साधने उपलब्ध न झाल्यामुळे ते स्वत:च्या मालकीची वाहने वाहतूक व्यवसायात आणू शकत नव्हते. आदिवासी विकास महामंडळाने ही कमतरता राष्ट्रीय अनुसुचित जाती/जमाती वित्त व विकास महामंडळाच्या कर्जरुपी सहाय्याने व लाभार्थ्यांच्या स्वत:च्या थोड्याश्या भागभांडवलाद्वारे दूर केली आहे. ज्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये २२,०००/- पेक्षाही कमी आहे, अशा शिक्षित बेरोजगार आदिवासी लाभार्थ्यांना वाहन किंमतीच्या ९० टक्के इतकी रक्कम केवळ ६ टक्के इतक्या नाममात्र व्याजदराने मुदत कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन दिली जाते. याच उद्देशाने 'एकलव्य मिनीट्रक योजना' आदिवासी विकासाला समर्पित करण्यात आलेली आहे.

३. लाभार्थ्यांसाठी आवश्यक पात्रता

ग्रामीण भागात वास्तव्य करणारे १८ ते ४० वर्षे वयोगटातील एस.एस.सी.पर्यंत शिक्षित व वाहनचालकांचा योग्य परवानाधारक आदिवासी व्यक्ती त्यांचे एकत्रित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये २२,०००/- (रुपये बावीस हजार फक्त) पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

४. पैशाची व्यवस्था

हलक्या वजनाच्या एका व्यापारी वाहनाची किंमत (विक्रीकर विरहित) सुमारे रु.२.६० लक्ष रुपये ते ३.२५ लक्ष इतकी असते. ही किंमत वेगवेगळया बनावटीच्या गाड्या व त्यांची वहन क्षमता यांवर अवलंबून असते. लाभार्थ्याने आपली कुवत तसेच आपल्या पसंतीनुसार अशा वाहनाची निवड आपल्या अर्जात नमूद करावयाची असते. त्याप्रमाणे त्या वाहनाच्या किंमतीनुसार लाभार्थ्याच्या वैयक्तिक हिस्सा (सहभाग) निश्चित केला जाते. आदिवासी विकास महामंडळाद्वारे या योजनेकरिता एकूण रुपये २.३०

लक्ष इतके कर्ज मिळवून देण्यात येते. ज्यामध्ये राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त महामंडळाचे रुपये १.७० लक्ष, आदिवासी विकास महामंडळाचे रुपये ०.३० लक्ष, उद्योग संचालनालयाचे रु.०.३० लक्ष असा हिस्सा असतो. उर्वरित रक्कम लाभार्थ्याने स्वत:चा वैयक्तिक सहभाग म्हणून घालावयाची असते.

५. सवलती- विक्री करातून सूट-

या योजनेस राज्य शासनाकडून आदिवासींचा सहाय्य म्हणून विक्री करात सूट देण्यात आलेली आहे. वाहनावर आकारण्यात येणारा ८ टक्के इतका विक्रीकर माफ करण्यात आलेला असल्यामुळे लाभार्थ्यांस त्याचा फायदा मिळतो.

६. परतफेडीच्या अटी-

ही योजना लाभार्थ्याने योग्य रित्या हाताळल्यास व वाहनाचा चांगला उपयोग करुन घेतल्यास त्याला उत्पन्नाचे एक चांगले साधन निर्माण होते. आणि मूळातच व्याजदर अल्प असल्याने कर्जाचा बोजा मोठ्या प्रमाणावर पडत नाही.

परतफेडीच्या एका त्रैमासिक हप्त्याची रक्कम रु.१५,०००/- इतकी असते. सर्व कर्ज पाच वर्षाचे कालावधीत एकूण २० त्रैमासिक हप्त्यात वसूल करावयाची असून कर्ज आणि व्याजाची वेळीच परतफेड केल्यास लाभार्थ्यास विशेष सुट दिली जाते.

७. अर्ज कोठे करावयाचा ?

वर दर्शविलेल्या अटींची पूर्तता करीत असलेल्या पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यानुसार आणि आवश्यक त्या माहिती दस्तऐवजासह आपला अर्ज आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक किंवा उपप्रादेशिक कार्यालयास सादर करावयाचे असतात. या अर्जाची रितसर छाननी महामंडळाकडून होऊन त्यास मंजूरी दिली जाते. त्यानंतर लाभार्थ्याने भरणा करावयाची आपल्या सहभागाची रक्कम आदिवासी विकास महामंडळाचे नांवाने स्वतंत्र डिमांड ड्राफटद्वारे ती महामंडळाकडे जमा करावी लागते.

८. अर्जाची छाननी आणि मंजूरी-

प्रारुप नमुन्यात दिलेला अर्ज महामंडळाचे उपप्रादेशिक किंवा प्रादेशिक कार्यालयात सादर केल्यानंतर प्रादेशिक स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या मूल्यमापन समितीकडून त्या अर्ज प्रकरणांची छाननी होते व त्यास मंजूरी देण्यात येते.

प्रादेशिक स्तरावरील मूल्यमापन समितीची संरचना-

| | | |
|---|---|---|
| अ. | अपर आयुक्त, आदिवासी विकास (संबंधित विभागाचे) | अध्यक्ष |
| ब. | महामंडळाचे संचालक सदस्य (संबंधित जिल्हयातून निवड आलेले) | सदस्य |
| क. | संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. | सदस्य |
| ड. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| इ. | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, मर्या. प्रादेशिक कार्यालय (संबंधित) | सदस्य सचिव |

## ९. वाहन ताब्यात मिळण्याचे (डिलीव्हरी) ठिकाण व पध्दत

मूल्यमापन समितीने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणांची माहिती व लाभार्थ्याच्या सहभागाची रक्कम तीन दिवसात प्रादेशिक कार्यालयाकडून महामंडळाचे मुख्य कार्यालयास पाठविण्यात येते. प्रकरण मंजूरीनंतर लाभार्थ्याने निवड केलेल्या वाहनाची खरेदी किंमत संबंधित कंपनीस/विक्रेत्यास मुख्य कार्यालयामार्फत अदा केली जाते. त्यानुसार कंपनीने/विक्रेत्याने महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकडे वाहन सुपूर्त केल्यानंतर प्रादेशिक व्यवस्थापक हे टॅक्सेस, रजिस्ट्रेशन, विमा इत्यादी कागदपत्रांची पूर्तता पूर्ण करुन वाहनाचा ताबा लाभार्थीस दिला जातो.

## २.३ न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराच्या योजना-

सन १९८१-८२ या वर्षापासून शासनातर्फे राबविण्यात येत असलेल्या न्युक्लिअस योजनांचे ४ प्रमुख गट पाडण्यात आले आहेत.

१. उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना

२. प्रशिक्षणाच्या योजना

३. मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना

४. आदिवासी कल्याणात्मक योजना

*उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना*

या योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराच्या वैयक्तिक किंवा कुटुंबाच्या लाभाच्या योजनांचा समावेश अंतर्भुत आहे.

महाराष्ट्र राज्यात निरनिराळया क्षेत्रात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातींच्या विकासाच्या प्रगतीमध्ये ठिकठिकाणी तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमांच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीमधील विपुलता,

विविधता अथवा त्रुटी भिन्न असल्यामुळे आदिवासी विकासासाठी ठराविक साच्याचे कार्यक्रम सर्वच प्रकल्प क्षेत्रात उपयुक्त ठरु शकणार नाहीत.

## २.४ महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगाराच्या योजना

खादी ग्रामोद्योगाच्या कक्षेतील योजनांसाठी खादी ग्रामोद्योग आयोगाकडून विविध प्रकारे आर्थिक सहाय्य देण्यात येते. १८६० च्या रजिस्ट्रेशन कायद्यान्वये नोंदविलेल्या संस्था, सहकारी संस्था, उद्योजक, कारागिर यांच्यामार्फत या योजना राबविण्यात येतात.

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या कक्षेतील उद्योग-**

(१) *खनिज संपत्तीवर आधारीत उद्योग-*

१. ग्रामीण कुंभार उद्योग

२. चूना उद्योग

३. दगड फोडणे, खडी करणे, कोरणे, नक्षीकाम करणे इत्यादी

४. दगडापासून बनविलेल्या उपयुक्त वस्तु

५. दगडी पाट्या आणि पेन्सिल तयार करणे

६. प्लॅस्टर ऑफ पॅरिस तयार करणे

७. भांडी साफ करण्याची पावडर बनविणे

८. सरपणापासून कोळसा तयार करणे

९. सोने, चांदी, खडे, शिंपले आणि कृत्रीम धातुपासून दागिने तयार करणे.

१०. रांगोळी बनविणे

११. लाखेच्या बांगड्या बनविणे

१२. रंग, वॉर्निश, डिस्टेंपर बनविणे.

(२) *वन संपत्तीवर आधारीत उद्योग*

१. हातकागद उद्योग

२. आगपेटी उद्योग

३. वारव उद्योग

४. गोंद आणि रेक्झीन उद्योग

५. लाख उद्योग

६. वेत व बांबू उद्योग

७. कात उद्योग

८. पेपर कप्स, प्लेटस, पिशव्या व कागदाची इतर उत्पादने

९. वहया तयार करणे

१०. वाळ्याचे पडदे व केरसुणी तयार करणे

११. वन उत्पादनाचे संकलन, प्रक्रीया आणि पॅकींग

१२. फोटो फ्रेमिंग

*(३) शेतमालावर आधारीत उद्योग*

१. धान्य, डाळी प्रक्रीया उद्योग, पापड, लोणची, मसाले बनविणे इत्यादी

२. ग्रामीण तेल उद्योग

३. गुळ व खांडसरी उद्योग

४. नीरा, ताडगुळ उद्योग

५. औषधी वनस्पती संकलन उद्योग

६. फळ प्रक्रीया आणि परिरक्षण उद्योग

७. तरटी, चटया व हार तयार करणे

८. काजू प्रक्रीया

९. द्रोण व पत्रावळी तयार करणे

१०. तागापासून वस्तु बनविणे (वाख उद्योगांतर्गत)

११. मक्यावरील प्रक्रीया

*(४) पॉलिमर आणि रसायनावरील आधारीत उद्योग*

१. ग्रामीण चर्मोद्योग

२. अखाद्यतेल व साबण उद्योग

३. रबराच्या वस्तु बनविणे (रबर उद्योग)

४. रेक्झीनपासून बनविलेल्या वस्तु पी.व्ही.सी.पाईप इत्यादी

५. शिंगे व हाडे यांच्यपासून हस्तीदंती वस्तु

६. मेणबत्ती, कापूर व लाख तयार करणे

७. प्लॅस्टीकची पार्सल्स तयार करणे.

८. टिकल्या, बिंदी तयार करणे

९. मेहंदी तयार करणे

१०. सुगंधी तेले तयार करणे

११. शाम्पू तयार करणे

१२. केशतेल निर्मिती करणे

१३. धुण्याचा साबण व पावडर बनविणे

*(५) अभियांत्रिकी व अपारंपारिक उर्जेवर आधारीत उद्योग*

१. सुतारकाम

२. लोहारकाम

३. अल्युमिनियम उद्योग

४. गोबर गॅस प्लँट योजना

५. पेपर/पिन्स, क्लीप्स, सेफटी पिन्स, स्टोव्ह पिन्स इ.तयार करणे तसेच या संदर्भातील अनेक उद्योग

*(६) वस्त्रोद्योग*

१. खादी (सुती रेशीम लोकर)

२. पॉलीवस्त्र (खादी व्यतिरिक्त)

३. लोकवस्त्र

४. होजिअरी

५. शिवणकाम आणि तयार कपडे

६. नॉयलॉन अथवा सुती, मासे पकडण्याचे जाळे

७. बाटिक वर्क

८. खेळणी व बाहुल्या बनविणे

९. सुतांच्या व लोकरीच्या गुंड्या तयार करणे

१०. भरतकाम

११. स्टोव्हच्या वाती बनविणे

(७) *सेवा उद्योग*

१. कपडे धुलाई (लाँड्री)

२. केस कर्तनालय (सलून)

३. नळकाम (प्लंबिंग)

४. विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची दुरुस्ती व देखभाल

५. डिझेल इंजिन्स व पंपाच्या सेट्सची दुरुस्ती

६. टायर दुरुस्ती

७. किटक नाशक फवारे व पंप सेटस दुरुस्ती इत्यादी

८. लाऊड स्पिकर्स, ध्वनीवर्धक यंत्र भाड्याने देणे

९. बॅटरी चार्जिंग

१०. कलात्मक फलक रंगविणे

११. मोटार सायकल, सायकल दुरुस्ती दुकान

१२. गवंडी काम

## दुर्बल घटकांसाठी विशेष सवलती-

केंद्र सरकारने राज्यातील आदिवासी उपयोजना अंतर्गत काही तहसिल व गांवे निश्चित केलेली आहेत. उपयोजना क्षेत्रातील आदिवासी व अनुसूचित जातीच्या कारागिरांना खादी आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधप्रमाणे भांडवली खर्चाकरिता २५ टक्के कर्ज व ७५ टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. याशिवाय कुष्ठरोगमुक्त व्यक्तींनाही वरीलप्रमाणेच अर्थसहाय्य देण्याची तरतूद आहे.

## महिला व मागासवर्गीयांसाठी विशेष सवलती

खादी ग्रामोद्योगाच्या आकृतीबंधानुसार १०० टक्के महिला सभासद असलेल्या सहकारी संस्थांना मंडळाच्या यादीतील उद्योगासाठी भांडवल कर्जाच्या एकूण रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. तसेच १०० टक्के अनुसूचित जाती व जमातीचे सभासद असलेल्या सहकारी संस्था, नोंदणीकृत संस्थांना खादी आयोगाच्या आकृतीबंधानुसार भांडवली कर्जातील इमारत व शेड बांधकामासाठी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिले जाते. तसेच हत्यारे, अवजारे आणि मशिनरी खरेदीच्या ६५ टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. या व्यतिरिक्त खालील संस्थानाही. आर्थिक सहाय्य दिले जाते.

१. १८६० च्या कायद्यान्वये रजिस्टर्ड झालेल्या संस्था

२. १९६० च्या सहकार कायद्यान्वये नोंदणी झालेल्या सहकारी संस्था

३. १९५० च्या सार्वजानिक विश्वस्त कायद्याखाली नोंदणी झालेल्या संस्था

४. ग्रामीण उद्योजक / ग्रामीण कारागिर

तथापि, उपरोक्त आर्थिक सहाय्यासाठी उद्योग महसूली खेड्यात सुरु करणे आवश्यक आहे व उद्योगात माणशी १५,०००/- रुपयांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणूक असता कामा नये.

## अर्थसहाय्याचे विविध प्रकार-

१. *भांडवली खर्च-*

खादी ग्रामोद्योगाच्या आर्थिक सहाय्याचे आकृतिबंधानुसार जमीन (इमारत, गोदाम, कार्यशाळा, शेड मशिनरी) हत्यारे व अवजारासाठी

२. *खेळते भांडवल*

खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतिबंधप्रमाणे

३. *भाग भांडवली कर्ज*

खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्य आकृतिबंधानुसार सहकारी सोसायट्या / कारागिर सभासदांना भाग खरेदीसाठी

४. *भांडवली संचय खर्च-*

१९६० च्या अधिनियमाखाली व सार्वजानिक विश्वस्त अधिनियमाखाली नोंदविलेल्या संस्थांना खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधानुसार भांडवल संचय कर्ज.

५. *साठा कर्ज-*

ग्रामीण तेल उद्योग, कुंभार उद्योग, चर्मोद्योग इ.साठी सोसायट्या संस्थांस कच्चा माल साठविण्याकरिता आर्थिक सहाय्य मंजूर केले जाते.

६. *विक्री व्यवस्था :-*

ग्राम-शिल्प, चर्म शिल्प इ.विक्री भांडाराकरिता भांडवली खर्च, कर्ज व खेळते भांडवल आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधानुसार

७. *अनुदान*

भांडवली कर्जाबरोबर काही युनिटना ठराविक प्रमाणात अनुदानही दिले जाते.

वरील सर्व प्रकारच्या कर्जावर द.सा.द.शे.फक्त ४ टक्के व्याज आकारले जाते. खादीसाठी दिले जाणारे कर्ज तर बिनव्याजी असते.

विक्री करात सवलत-

महाराष्ट्र शासनाच्या १९५९ च्या विक्रीकर कायद्यातील तरतूदीनुसार ग्रामोद्योगंतर्गत उत्पादित झालेल्या वस्तुंच्या विक्रीवरील विक्रीकरात सूट देण्याची शिफारस मंडळ करते.

विक्री व्यवस्था-

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील उद्योजक कारागिरांनी तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बलुतेदार सोसायट्यामार्फत व इतरत्र मंडळामार्फत २९० ग्रामोद्योग विक्री केंद्रे सुरु केली आहेत. त्याचप्रमाणे गांवोगांव फिरुन खादी व ग्रामोद्योग वस्तुंची विक्री करण्यासाठी मंडळाने ६ महसूली भागांसाठी ६ विक्री वाहने खरेदी केलेली असून या फिरत्या विक्री वाहनामार्फत उद्योजक कारागिरांच्या वस्तुंची विक्री मंडळामार्फत गांवोगांव केली जाते.

# प्रकरण क्र.३

## मूल्यमापन अहवालाचा उद्देश, व्याप्ती व सर्वेक्षण पध्दत

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाचा एक भाग म्हणून त्यांचा शैक्षणिक विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने आदिवासी भागात शासकीय व खाजगी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. जिल्हा परिषद शाळा ही पूर्वीपासून कार्यरत आहेत. शिवाय काही तालुक्याच्या जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय वसतीगृहे उघडण्यात आली आहेत. त्यामुळे आदिवासी मुला-मुलींना प्राथमिक, माध्यमिक शिक्षणानंतर उच्च शिक्षण घेणे सुलभ झाले आहे. त्यामुळे विविध शैक्षणिक संस्थामधून आदिवासी युवक /युवती शैक्षणिक पदवी/पदविका प्राप्त झाल्यानंतर नोकरीची संधी कशी उपलब्ध होईल, यासाठी प्रयत्नशील असतात. पण सर्वांनाच नोकरीच्या स्वरुपात रोजगार उपलब्ध होणे शक्य नसल्याने व काहींना खाजगी अडचणीमुळे स्वत:चे घर अथवा गांव/सोडता येणे अशक्य असल्याने सुशिक्षित तरुणांना अर्थाजनासाठी स्वयंरोजगाराकडे वळणे क्रमप्राप्त झाले आहे. शासनातर्फे स्वयंरोजगाराच्या वेगवेगळया योजना जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, इत्यादी कार्यालयामार्फत राबविल्या जातात, हे मागील प्रकरणात सांगितले आहेच.

स्वयंरोजगाराकडे वळलेल्या आदिवासी तरुणांना स्वयंरोजगाराचा कितपत फायदा झाला ? या योजनांच्या आखणी व अंमबबजावणीत काही त्रुटी आढळतात काय ? योजनांच्या स्वरुपात काही बदल करणे आवश्यक आहे काय ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने प्रस्तुत मूल्यमापन अभ्यासामध्ये खालील उद्देश डोळयासमोर ठेवण्यात आले आहेत.

(२)१. स्वयंरोजगाराच्या वरील योजनापैकी नेमक्या कोणत्या योजनांचा लाभ घेण्याकडे आदिवासी युवकांचा कल आहे ते पाहणे, त्याची कारणे शोधणे.

२. वेगवेगळया योजनांतर्गत स्वयंरोजगार उपलब्ध झालेल्या युवकांचे प्रमाण अभ्यासणे.

३. शासनाच्या उदिष्ट्रमाणे स्वयंरोजगार उपलब्ध झालेल्या आदिवासी युवकांचे /युवतींचे प्रमाण काय आहे ते पाहणे व नसल्यास त्याची कारणे शोधणे.

४. कोणकोणत्या व्यवसांयासाठी रोजगार उपलब्ध झाला ते पाहणे.

५. स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेण्यासाठी पुरेशा प्रमाणात आदिवासी युवक /युवती पुढे येत नसतील तर त्यामागील कारणे युवकांकडूनच जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

६. योजना राबविताना कार्यान्वय अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

७. धुळे/गडचिरोली या सारख्या दुर्गम आदिवासी भाग असलेल्या जिल्हयात स्वयंरोजगाराचे आणखी कोणते व्यवसाय उपयुक्त ठरु शकतील याचा शोध घेणे.

८. स्वयंरोजगार योजनेमुळे आदिवासी युवक/युवतींच्या आर्थिक परिस्थितीत पूर्वीपेक्षा सुधारणा झाली किंवा नाही ते पाहणे इ.

## (३) क्षेत्रीय पाहणी-

क्षेत्रीय कामकाज पाहणीसाठी सहयाद्री विभागातील धुळे व गोंडवन विभागातील गडचिरोली या दोन आदिवासी जिल्हयांची निवड करण्यात आली. सर्वेक्षण कामाचे स्वरुप, सर्वेक्षणाच्या कामी उपलब्ध होणारा संस्थेतील कर्मचारीवृंद व मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी दिलेला कालावधी विचारात घेऊन उपरोक्त जिल्हयातील ठराविक तालुक्यातच सर्वेक्षण करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी धुळे जिल्हयातील नंदूरबार, साक्री व नवापूर हे तालुके तर गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, धानोरा, आरमोरी व चार्मोशी या तालुक्यांची निवड करण्यात आली. पाहणीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, प्रादेशिक कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ, जिल्हा खादी व ग्रामोद्योग महामंडळ व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यांची निवड करण्यात आली व पाहणीतील निष्कर्ष सर्वकष येण्यासाठी रस्त्यालगतची तसेच दुर्गम भागातील गांवाची निवड करण्यात आली. क्षेत्रीय कामकाज पाहणीमध्ये जिल्हा, तालुका, गांव व कुटुंब स्तरावरील माहिती गोळा करण्यात आली. तसेच अंमलबजावणी अधिकाऱ्यांचे अभिप्राय देखील मुलाखतीद्वारे गोळा करण्यात आले. पाहणीसाठी निवडण्यात आलेले जिल्हे/तालुके, गांवे तसेच भेटी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या इ.बाबत माहिती खालील तक्त्याप्रमाणे दिग्दर्शित करता येईल.

(४)

तक्ता क्र.३.१

**स्वयंरोजगार योजनेअंतर्गत निवडलेल्या जिल्हा/तालुका/गांवनिहाय लाभार्थींची संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गांवांची संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १.अ | धुळे | साक्री | ५ | ५ |
| २. | | नवापूर | ७ | ९ |
| ३. | | नंदूरबार | १० | १५ |
| एकूण (अ) | | | २२ | २९ |
| १.ब | गडचिरोली | गडचिरोली | ३ | ८ |
| २. | | आरमोरी | २ | ३ |
| ३. | | धानोरा | ३ | ३ |
| ४. | | चार्मोशी | ३ | ३ |
| ५. | | वडसा (देसाईगंज) | २ | २ |
| एकूण (ब) | | | १३ | १९ |
| एकूण (अ+ब) | | | ३५ | ४८ |

## (५) संदर्भ वर्ष :-

मूल्यमापन अहवालात नमूद केलेल्या स्वयंरोजगाराच्या योजनांचा अभ्यास करण्यासाठी १९९२-९३ व १९९३-९४ ही दोन वर्षे संदर्भ वर्षे म्हणून ठरविण्यात आली. तथापि, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत न्युक्लिअस बजेटच्या १०० टक्के अर्थसहाय्य दिलेल्या योजनांचा अभ्यास करण्यासाठी १९९३-९४ व १९९४-९५ ही वर्षे संदर्भ वर्षे म्हणून धरण्यात आली.

## (६) लाभार्थ्यांची निवड :-

स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेल्या धुळे जिल्हयातील २९ व गडचिरोली जिल्हयातील १९ अशा एकूण ४८ लाभार्थ्यांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली अंतर्गत १०० टक्के अर्थसहाय्याचा लाभ घेतलेल्या, तर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार अंतर्गत ५० टक्के अर्थसहाय्याचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत काही वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या तर काही बलुतेदार सहकारी संस्थामार्फत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत असलेल्या योजनांपैकी सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेतील कर्ज दिलेल्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली तर आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत एकलव्य मिनीट्रक योजनेच्या लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. लाभार्थ्यांची निवड करतांना रस्त्यालगतच्या गांवातील व दुर्गम गांवातील आदिवासी लाभार्थी यांचा समावेश करण्यात आला आहे.

## (७) पाहणीत भरावयाची पत्रके

क्षेत्रीय पाहणीमध्ये निरनिराळया स्तरावरील माहिती गोळा करण्यात आली. यामध्ये स्वयंरोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबांची माहिती, योजना कार्यरत करणारे अधिकारी व बँक अधिकाऱ्यांचे अभिप्राय यांचा अंतर्भाव आहे. यासाठी निरनिराळया तीन प्रकारची पत्रके तयार करुन त्यामध्ये माहिती गोळा करण्यात आली.

## (८) प्रपत्र क्र.१

*लाभार्थ्यांसाठी प्रश्नावली*

सदर प्रश्नावलीत लाभार्थ्यांचा योजनेचा लाभ घेण्यापूर्वीचा मुख्य व दुय्यम व्यवसाय आणि कुटुंब स्तरावरील इतर माहितीचा समावेश आहे. तसेच स्वयंरोजगार योजनेमुळे लाभार्थ्यांचा आर्थिक

फायदा झाला किंवा नाही. घरातील इतर व्यक्तींना रोजगार मिळाला किंवा कसे ? याबाबतची माहिती या प्रपत्राद्वारे गोळा करण्यात आली.

(९) प्रपत्र क्र.२

*कार्यान्वय अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली*

स्वयंरोजगाराच्या योजनेसाठी शासनाने वेळोवेळी केलेली तरतूद, प्रत्यक्षात मिळणारी मदत पुरेशी आहे किंवा नाही. या योजनेस आदिवासी तरुणांचा असलेला प्रतिसाद योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींना दिलेल्या भेटी व केलेले मार्गदर्शन तसेच योजना राबवितांना अधिकाऱ्यांना येणाऱ्या प्रशासकीय अडचणी व अधिकाऱ्यांचे योजनेबाबतचे अभिप्राय इत्यादी बाबींचा या प्रश्नावलीत समावेश केलेला आहे.

(१०) प्रपत्र क्र.३

*बँक अधिकारी/वित्त संस्था यांचेसाठी प्रश्नावली*

सदर प्रश्नावलीमध्ये बँकेमार्फत लाभार्थ्यांना दिले जाणारे कर्ज, व्याजाचा दर, कर्जाची वसूली पध्दत, कर्ज वसूलीबाबत आदिवासी लाभार्थ्यांचा प्रतिसाद, कर्जासाठी लागणारी कागदपत्रांची पूर्तता, कर्ज घेण्यासाठी आदिवासी लाभार्थ्यांचा प्रतिसाद व योजना राबविताना बँक अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांचे अभिप्राय वगैरे गोष्टी अंतर्भुत करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त तीनही प्रपत्रे परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहेत.

(११) संशोधन पध्दती

हा अहवाल तयार करतांना आर.आर.ए.ही संशोधन पध्दती वापरण्यात आली. आर.आर.ए.संशोधन पध्दतीत लोकांमध्ये मिसळून प्रत्यक्ष निरीक्षण व अनौपचारिक गप्पांतून माहिती गोळा करुन निष्कर्ष काढण्यावर भर दिला जातो. त्याचप्रमाणे बँकेचे अधिकारी, योजनांची अंमलबजावणी करणारे अधिकारी यांचेशी अनौपचारिक गप्पांतून स्वयंरोजगाराच्या योजनेविषयी आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली. याशिवाय विहित ३ प्रपत्रात माहिती गोळा करण्यात आली. प्रपत्र-१ लाभार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्रपत्र-२ कार्यान्वयन अधिकाऱ्यासाठी प्रश्नावली, प्रपत्र क्र.३ बँक अधिकारी/वित्त संस्था याप्रमाणे प्रश्नावली तयार करण्यात आल्या होत्या. एकूण ३५ गांवातील ४८ लाभार्थ्यांची प्रपत्रे भरुन माहिती गोळा करण्यात आली व त्या माहितीचा आधार मूल्यमापन अहवाल तयार करतांना घेण्यात आलेला आहे.

# प्रकरण क्र.४

## क्षेत्रीय निरीक्षणात गोळा केलेल्या माहितीचे पृथ:करण

क्षेत्रीय पाहणीमध्ये स्वयंरोजगाराच्या योजना प्रामुख्याने ज्या कार्यालयामार्फत राबविल्या जातात, अशा खाली नमूद केलेल्या

१. जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय

२. प्रादेशिक कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ

३. जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालय,

४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय

इत्यादींना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्यामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती घेण्यात आली. तसेच लाभार्थ्यांकडून मूल्यमापन पाहणीच्या उद्देशाच्या संदर्भात सर्वांगीण माहिती गोळा करण्यात आली. एकूण ४८ लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. याशिवाय, योजना अंमलबजावणी अधिकारी, बँक अधिकारी यांचे अभिप्राय, अडचणी व सूचना संकलित करण्यात आल्या. उपरोक्त संकलित माहितीचे पृथ:करण तक्ता क्र.४.१ ते ४.११ मध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्र.४.१

जमातीनिहाय लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | जमातीचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भिल्ल | कोकणी | ठाकूर | गोंड | हलबा | एकूण |
| १. | धुळे | २३ | ५ | १ | - | - | २९ |
| २. | गडचिरोली | - | - | - | १७ | २ | १९ |
| एकूण | | २३ | ५ | १ | १७ | २ | ४८ |
| टक्केवारी | | ४८ | १० | २ | ३६ | ४ | १०० |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, पाहणी केलेल्या लाभार्थ्यांमध्ये भिल्ल व गोंड जमातींचा सहभाग सर्वाधिक आहे. एकूण लाभधारकांपैकी ४८ टक्के भिल्ल जमातीच्या लाभार्थ्यांनी या योजनांचा फायदा घेतला असून त्या खालोखाल ३६ टक्के गोंड जमातीच्या उमेदवारांनी या योजनांचा फायदा घेतला. कोकणी, हलबा व ठाकूर या जमातीतील लोकांनी या योजनांपासून त्यामानाने कमी फायदा घेतलेला आहे.




Chart Showing Tribewise No. of Beneficiaries in Sample
Halba
4%
Gond
36%
Bhill
48%
Thakur
2%
Kokani
10%

### तक्ता क्र.४.२

### शैक्षणिक पात्रतेनुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | शैक्षणिक पात्रता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अशिक्षित | इ.१ ली ते ४ थी | इ.५ वी ते १० वी | इ.१२ वीपर्यंत | महाविद्या-लयीन द्वितीय वर्ष | महाविद्या-लयीन तृतीय वर्ष |
| १. | धुळे | २९ | २ | ३ | १३ | ५ | २ | ४ |
| २. | गडचिरोली | १९ | १ | ३ | ७ | ७ | - | १ |
| एकूण | | ४८ | ३ | ६ | २० | १२ | २ | ५ |
| टक्केवारी | | १०० | ६ | १३ | ४२ | २५ | ४ | १० |


तक्ता क्र.४.२ वरुन असे निदर्शनास येते की, पाहणी केलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी ६ टक्के लाभार्थी अशिक्षित आहेत. इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांची टक्केवारी सर्वात जास्त म्हणजे ४२ टक्के एवढी आहे. त्या खालोखाल १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांची टक्केवारी २५ टक्के एवढी आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले एकूण ५ लाभार्थी असून त्यांची टक्केवारी १० इतकी आहे. थोडक्यात, महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या युवकांचे प्रमाण अल्प असल्याचे आढळते.

### तक्ता क्र.४.३

### जमीन धारण क्षेत्रानुसार लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता


| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | भूमीहीन | २.५ एकरपेक्षा कमी क्षेत्र असलेले लाभार्थी | २.५ ते ५.० एकर क्षेत्र असलेले लाभार्थी | ५ एकरापेक्षा जास्त क्षेत्र असलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | धुळे | २९ | ८ | ८ | १३ | - |
| २. | गडचिरोली | १९ | ९ | २ | ७ | १ |
| एकूण | | ४८ | १७ | १० | २० | १ |
| टक्केवारी | | १०० | ३५ | २१ | ४२ | २ |

तक्ता क्र.४.३ वरुन असे निदर्शनास येते की, पाहणी केलेल्या एकूण ४८ लाभार्थ्यांपैकी २.५ ते ५ एकरापर्यंत क्षेत्र असलेले सर्वात जास्त लाभार्थी आहेत. त्यांचे प्रमाण ४२ टक्के (२० लाभार्थी) एवढे आहे. तर भूमीहीन एकूण १७ लाभार्थी असून त्यांची टक्केवारी ३५ एवढी आहे. त्या खालोखाल १० लाभार्थ्यांकडे २.५ एकरापेक्षा कमी क्षेत्र असून त्यांची टक्केवारी २१ टक्के इतकी आहे. ५ एकरापेक्षा जास्त क्षेत्र असलेला फक्त एकच लाभार्थी पाहणीत आढळून आला. त्याची टक्केवारी २ इतकी आहे.



Graph Showing Districtwise No. of Beneficiaries According To Educational Qualification
Dhule
Gadchiroli
Total
No. of beneficiaries
50
45
40
35
30
25
20
15
10
5
0
29
19
48
2
1
3
3
3
6
13
7
20
5
7
12
2
2
4
1
5
Total Beneficiaries
Illiterate
1st to 4th
5th to 10th
up to 12th
2nd yr. college
3rd yr. college

Chart Showing No. of Beneficiaries Classified According To Land Holding



तक्ता क्र.४.४

भूमीहीन कोरडवाहू व बागायती जमीन क्षेत्रानुसार लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | भूमीहीन | निव्वळ कोरडवाहू क्षेत्र असलेले लाभार्थी | निव्वळ बागायती क्षेत्र असलेले लाभार्थी | कोरडवाहू व बागायवती क्षेत्र असलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | धुळे | २९ | ८ | १८ | १ | २ |
| २. | गडचिरोली | १९ | ९ | ७ | २ | १ |
| एकूण | | ४८ | १७ | २५ | ३ | ३ |
| टक्केवारी | | १०० | ३६ | ५२ | ६ | ६ |

तक्ता क्र.४.४ वरुन असे आढळून येते की, एकूण ४८ लाभार्थ्यांपैकी, २५ लाभार्थ्यांकडे (५२.००) निव्वळ कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र आहे. तर निव्वळ बागायती क्षेत्र असलेले फक्त ३ लाभार्थी आहेत. तसेच कोरडवाहू व बागायती क्षेत्र असलेले लाभार्थी देखील ३ आहेत. यांची टक्केवारी ६ इतकी आहे. याचाच अर्थ निव्वळ कोरडवाहू व बागायती क्षेत्र असलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

तक्ता क्र.४.५

योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी लाभार्थ्यांचा व्यवसाय व लाभार्थ्यांची अन्य स्थिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | एकूण | व्यवसाय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी | शेती | मजूरी | नोकरी | लोहार काम | बांबू काम | वाहतूक व्यवसाय | सायकल दुकान | शिक्षण |
| १. | धुळे | २९ | २१ | ३ | - | १ | २ | १ | - | १ |
| २. | गडचिरोली | १९ | १० | ५ | १ | - | २ | - | १ | - |
| एकूण | | ४८ | ३१ | ८ | १ | १ | ४ | १ | १ | १ |
| टक्केवारी | | १०० | ६५ | १७ | २ | २ | ८ | २ | २ | २ |

तक्ता क्र.४.५ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी जास्तीत जास्त लाभार्थी शेती व्यवसायात गुंतलेलेले होते. त्यांची टक्केवारी ६५ टक्के इतकी असून ३१ लाभार्थी शेती व्यवसायाशी निगडीत होते. त्या खालोखाल ८ लाभार्थी (१७ टक्के) मजूरी, तर बांबूकाम करणारे ४ लाभार्थी असून त्यांची टक्केवारी ८ टक्के इतकी आहे. नोकरी, लोहार काम, वाहतूक व्यवसाय, सायकल दुकान व शिक्षण यांच्याशी निगडीत असणारे लाभार्थी प्रत्येकी एक असून त्यांची प्रत्येकी टक्केवारी २ टक्के एवढी आहे व हे प्रमाण अतिशय नगण्य आहे.

तक्ता क्र.४.६

**योजनेचा लाभ घेतल्यानंतर व्यवसायनिहाय लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | जिल्हानिहाय लाभार्थी संख्या | | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| | | धुळे | गडचिरोली | |
| १. | वाहतूक | ६ | ४ | १० |
| २. | सुतारकाम | १ | - | १ |
| ३. | लोहार काम | १ | - | १ |
| ४. | लिप काम | १ | - | १ |
| ५. | बांबू काम | ३ | २ | ५ |
| ६. | शिवण काम | ३ | ६ | ९ |
| ७. | किराणा दुकान | ६ | - | ६ |
| ८. | धान्य मसाला युनिट | - | १ | १ |
| ९. | स्वस्त धान्य दुकान | ३ | २ | ५ |
| १०. | सायकल दुकान | १ | १ | २ |
| ११. | घड्याळ दुरुस्तीचे दुकान | - | १ | १ |
| १२. | जनरल स्टोअर्स | १ | - | १ |
| १३. | गॅस एजन्सी | - | १ | १ |
| १४. | प्रिटींग प्रेस | १ | - | १ |
| १५. | फर्टिलायझर | १ | - | १ |
| १६. | थ्रेशर मशिन | १ | - | १ |
| १७. | भाजीपाला व्यवसाय | - | १ | १ |
| | एकूण | २९ | १९ | ४८ |

तक्ता क्र.४.६ वरुन असे दिसून येते की, पाहणीतील एकूण ४८ लाभार्थ्यांनी निरनिराळ्या एकूण १७ व्यवसायांचा लाभ घेतलेला आहे. लाभ घेतलेल्या एकूण १७ व्यवसायापैकी धुळे जिल्हयातील २९ लाभार्थ्यांनी १३ व्यवसायांचा तर गडचिरोली जिल्हयातील १९ लाभार्थ्यांनी ९ व्यवसायांचा लाभ घेतला आहे. ज्या व्यवसायांचा लाभार्थ्यांनी जास्त लाभ घेतला आहे, असे व्यवसाय प्रामुख्याने वाहतूक, शिवणकाम, किराणा दुकान, स्वस्त धान्य दुकान, बांबूकाम, गॅस एजन्सी व प्रिटींग प्रेस इत्यादी नमुद करता येतील.

## तक्ता क्र.४.७

### लाभ घेतलेल्या व्यवसायांची सद्यस्थिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | जिल्हानिहाय व्यवसाय संख्या | व्यवसायांची सद्यस्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यान्वित झालेले | कार्यान्वत झालेले परंतू पाहणीच्या वेळी बंद असलेले |
| १. | धुळे | २९ | १३ * | १०* (७७%) | ३ (२३%) |
| २. | गडचिरोली | १९ | ९ * | ९ * | |

(* टीप- दोन्ही जिल्हयात काही व्यवसाय समान असल्याने लाभ घेतलेल्या एकूण १७ व्यवसायांशी वरील तक्त्यातील व्यवसायांची बेरीज जुळणार नाही.)

तक्ता क्र.४.७ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, धुळे जिल्हयातील २९ लाभार्थ्यांनी एकूण १३ व्यवसायांचा लाभ घेतला आहे. या १३ व्यवसायांपैकी १० व्यवसाय (७७%) पाहणीमध्ये कार्यान्वित असल्याचे आढळले तर उरलेले ३ व्यवसाय (२३%) पाहणीच्या वेळी बंद असल्याचे आढळून आलेत. गडचिरोली जिल्हयातील लाभधारकांनी लाभ घेतलेल्या एकूण ९ व्यवसायांपैकी सर्वच्या सर्व म्हणजे ९ व्यवसाय (१००% ) कार्यान्वयीत असल्याचे पाहणीत आढळले. बंद असलेल्या व्यवसायांच्या प्रमुख कारणांत प्रामुख्याने व्यवसायाकडे दुर्लक्ष, व्यवसायातील तोटा, व्यवसाय कौशल्य, अनुभवाचा अभाव व व्यवसायासाठी आवश्यक तेवढे कष्ट न घेणे इ.चा उल्लेख करता येईल.

## तक्ता क्र.४.८

### स्वयंरोजगार व्यवसायामुळे जादा काम मिळालेल्या व्यक्तींचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | जास्तीचे काम मिळालेल्या व्यक्तींचे वर्गीकरण | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | घरातील व्यक्ती | बाहेरील व्यक्ती | एकूण |
| १. | धुळे | २९ | २१ | ९ | ३० |
| २. | गडचिरोली | १९ | १३ | ९ | २२ |
| | एकूण | ४८ | ३४ | १८ | ५२ |

तक्ता क्र.४.८ चा आढावा घेतला असता असे आढळून येते की, लाभार्थ्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरु केल्याने घरच्या तसेच बाहेरील माणसांना जादा काम मिळाले आहे. एकूण ३४ घरची माणसे

वेगवेगळ्या व्यवसायाच्या कामात गुंतलेली असल्याचे दिसून येते. शिवाय घरातील माणसां व्यतिरिक्त बाहेरील इतर १८ माणसे वेगवेगळ्या व्यवसायांच्या कामासाठी लाभार्थ्यांनी लावलेली असल्याचे निदर्शनास येते. याचाच अर्थ कुटुंबाबाहेरील १८ व्यक्तींना व्यवसायाच्या निमित्ताने रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच ३४ माणसांच्या रोजगाराप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची घरातील माणसांमुळे बचत झालेली आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

तक्ता क्र.४.९

व्यवसायासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | व्यवसायासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार लाभार्थ्यांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घरातल्या घरात | स्वतंत्र जागा | वर्कशॉप | भाड्याची जागा | व्यवसायासाठी जागेची आवश्यकता असलेले |
| १. | धुळे | २९ | १८ | - | - | ४ | ७ |
| २. | गडचिरोली | १९ | १० | - | - | ५ | ४ |
| एकूण | | ४८ | २८ | - | - | ९ | ११ |
| टक्केवारी | | १०० | ५८ | - | - | १९ | २३ |

वरील तक्ता क्र.४.९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ४८ लाभार्थ्यांपैकी २८ लाभार्थ्यांनी (५८%) घरातल्या घरातच व्यवसाय सुरु केल्याचे निदर्शनास येते. तर ९ व्यावसायिकांनी (१९%) भाड्याच्या जागेत व्यवसाय सुरु केल्याचे दिसून येते.

पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी एकाही लाभार्थ्याने व्यवसायासाठी वर्कशॉप किंवा स्वतंत्र जागा घेतली नसल्याचे पाहणीत आढळून आले. वाहतूक व अन्य काही व्यवसायासाठी जागेची आवश्यकता नसते, असे यावरुन दिसून येते. स्वयंरोजगारासाठी जागेची आवश्यकता नसणाऱ्या व्यवसायांची संख्या ११ असून त्यांची टक्केवारी २३ टक्के एवढी आहे.

तक्ता क्र.४.१०

लाभार्थ्यांच्या व्यवसाय प्रशिक्षणाबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | व्यवसाय प्रशिक्षण घेतलेले लाभार्थी | व्यवसायाचा पूर्वानुभवअसलेले लाभार्थी | व्यवसाय प्रशिक्षण न घेतलेले लाभार्थी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | धुळे | १० | ५ | १४ | २९ |
| २. | गडचिरोली | ९ | ४ | ६ | १९ |
| एकूण | | १९ | ९ | २० | ४८ |
| टक्केवारी | | ३९ | १९ | ४२ | १०० |

तक्ता क्र.४.१० वरुन असे दिसून येते की, पाहणीसाठी निवडलेल्या एकूण ४८ लाभार्थ्यांपैकी २० लाभार्थ्यांनी व्यवसायाचे प्रशिक्षण घेतलेले नाही. प्रशिक्षण न घेणाऱ्या लाभार्थींची टक्केवारी सर्वाधिक म्हणजेच ४२ टक्के एवढी आहे. याचे कारण असे की, काही व्यवसाय उदा.किराणा दुकान, भाजीपाला विक्री, सायकल दुकान वगैरे यासाठी व्यवसाय प्रशिक्षणाची आवश्यकता भासत नाही व अशा व्यवसाय धारकांचाच समावेश वरील लाभार्थींमध्ये असल्याचे त्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

२. व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थींची संख्या १९ असून त्यांची टक्केवारी ३९ टक्के एवढी आहे. व्यवसाय प्रशिक्षण घेण्यात मुख्यत: वाहनचालक व शिवणकाम करणाऱ्या लाभार्थ्यांचाच समावेश आहे. वाहनचालकांचे प्रशिक्षण घेतलेल्या बहुतेक सर्व लाभार्थ्यांनी खाजगी ३ महिन्याचे प्रशिक्षण घेतल्याचे पाहणीच्या वेळी निदर्शनास आले. प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचेकडून शिवणकामाचे ६ महिन्याचे प्रशिक्षण घेतलेले एकूण ६ लाभार्थी पाहणीत आढळून आले. धुळे जिल्हयात शिवणकामाचे खाजगी प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थींची संख्या ३ असून त्यांनी २ महिन्यांचे खाजगी प्रशिक्षण घेतल्याचे निदर्शनास आले. व्यवसायाचा पूर्वानुभव असलेले ९ लाभार्थी पाहणीत आढळून आले. त्यांची टक्केवारी १९ टक्के एवढी आहे. व्यवसायाचा पूर्वानुभव असणाऱ्यात प्रामुख्याने सुतारकाम, लोहारकाम, घड्याळ दुरुस्ती, बांबूकाम इत्यादी परपंरागत व्यवसायांचा समावेश आहे.

तक्ता क्र.४.११

स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेण्यापूर्वी व लाभ घेतल्यानंतरच्या वार्षिक उत्पन्नानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | योजनेचा लाभ घेण्यापूर्वी उत्पन्न | | | | योजनेचा लाभ घेतल्यानंतर उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रु.३६०० पर्यंत | रु.३६०१ ते ६००० पर्यंत | रु.६००१ ते ११००० पर्यंत | रु.११००१ च्या पुढे | रु.३६०० पर्यंत | रु.३६०१ ते ६००० पर्यंत | रु.६००१ ते ११००० पर्यंत | रु.११००१ च्या पुढे |
| १. | धुळे | २९ | - | ६ | १९ | ४ | - | २ | ६ | २१ |
| २. | गडचिरोली | १९ | २ | ६ | २ | ९ | - | ३ | ३ | १३ |
| एकूण | | ४८ | २ | १२ | २१ | १३ | - | ५ | ९ | ३४ |
| टक्केवारी | | १०० | ४ | २५ | ४४ | २७ | - | १० | १९ | ७१ |

Chart Showing Districtwise, Income Rangewise no. of Beneficiaries Classified By ***"Income Before Availing Benefit"***




Table No. 4.11




Chart Showing Districtwise, Income Rangewise no. of Beneficiaries Classified By ***"Income After Availing Benefit"***
No. of Beneficiaries
50
45
40
35
30
25
20
15
10
5
0
29
2
6
21
19
3
3
13
48
0
5
9
34
Dhule
Gadchiroli
Total
Total Beneficiaries
Up to Rs. 3600
Rs. 3601 to 6000
Rs. 6001 to 11000
more than 11000

तक्ता क्र.४.११ वरुन असे निदर्शनास येते की, योजनेचा लाभ घेण्यापूर्वी रुपये ३६००/- वार्षिक उत्पन्न घेणारे जे ४ टक्के लाभार्थी होते. त्यांच्या उत्पन्नात या योजनेमुळे वाढ झालेली आहे. तसेच रुपये ३६०१ ते ६००० पर्यंत वार्षिक उत्पन्न घेणारे १२ लाभार्थी (२५%) होते. त्यांच्या उत्पन्नात या योजनेमुळे वाढ झालेली आहे. लाभ घेण्यापूर्वी रुपये ६००१ ते ११००० पर्यंत उत्पन्न घेणारे २१ लाभार्थी (४४%) होते. त्यांच्याही उत्पन्नात वाढ होऊन या गटातील त्यांच्या टक्केवारीचे प्रमाण ४४ टक्के वरुन १९ टक्के पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. लाभ घेण्यापूर्वी रुपये ११००१/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न घेणारे १३ लाभार्थी (२७%) होते. पण योजनेचा लाभ घेतल्यानंतर मात्र एकूण ३४ लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. हे प्रमाण २७ टक्क्यावरुन ७१ टक्के पर्यंत वाढलेले दिसते. म्हणजे या उत्पन्न गटात सुमारे ४४ टक्क्यांनी भरीव वाढ झाल्याचे आढळून येते.

# प्रकरण क्र.५

## निष्कर्ष

क्षेत्रीय पाहणी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उपलब्ध झालेली माहिती, योजना राबविणारे अधिकारी तसेच बँक अधिकारी इ.चे अभिप्राय विचारात घेता खालील निष्कर्ष निघतात.

**(अ) पाहणीवर आधारीत निष्कर्ष :-**

१. पाहणीसाठी निवडलेल्या धुळे व गडचिरोली जिल्हयातील एकूण ४८ लाभार्थ्यांपैकी धुळे जिल्हयातील 'भिल्ल' या आदिवासी जमातीच्या लाभार्थ्यांनी तर गडचिरोली जिल्हयात 'गोंड' जमातीच्या लाभार्थ्यांनी स्वयंरोजगार योजनेचा सर्वाधिक फायदा घेतल्याचे दिसून येते.

२. जमिनधारणेनुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण केले असता, अल्पभूधारक लाभार्थ्यांचे प्रमाण २१ टक्के इतके आढळते. २.५ ते ५ एकरापर्यंत क्षेत्र असलेले २० लाभार्थी (४२ टक्के ) आढळून आले. ५ एकरापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या केवळ १ लाभार्थी (२ टक्के) पाहणीत आढळून आले. भूमीहीन लाभार्थ्यांचे प्रमाण ३५ टक्के इतके आढळले. भूमीहीन लाभार्थ्यांचे प्रमाण जास्त असण्याचे मुख्य कारण म्हणजे काही लाभार्थ्यांच्या शेतीची खातेफोड झालेली नसल्याने शेतींची मालकी लाभार्थ्यांच्या वडिलांच्या नांवावरच आहे.

३. असे निर्दशनास आले की, योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी ६५ टक्के लाभार्थी शेतीच्या व्यवसायात गुंतलेले होते व शेती हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. तर मजूरी करणारे १७ टक्के लाभार्थी होते.

४. स्वयंरोजगार योजनेंतर्गत सुरु केलेल्या व्यवसायांमुळे बहुतेक लाभार्थ्यांच्या घरच्या व्यक्तींना जादा काम मिळालेले आहे, असे आढळून आले. काही व्यावसायिकांनी व्यवसायासाठी बाहेरची माणसेही कामाला घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, बाहेरच्या माणसांचे प्रमाण घरच्या लोकांच्या तुलनेने कमी आहे. वेगवेगळया व्यवसायांमार्फत ३४ घरच्या माणसांना जास्तीचे काम मिळालेले आढळते तर बाहेरच्या १८ व्यक्ती कामासाठी घेतल्याचे दिसून आले.

५. पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी बहुतेक लाभार्थ्यांनी घराचा ओटा किंवा घरातल्या घरातच व्यवसाय सुरु केला असल्याचे पाहणीत आढळून आले. मात्र काही मोजक्या लाभार्थ्यांनी व्यवसायासाठी भाड्यांची जागा घेतली असल्याचे पाहणीत आढळले.

६. पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी इ.१० वी पर्यंत शालेय शिक्षण घेतलेले सर्वाधिक म्हणजे ४२ टक्के लाभार्थी असल्याचे आढळून आले. तर फक्त १४ टक्के लाभार्थ्यांनी महाविद्यालीयन शिक्षण घेतलेले आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांची टक्केवारी २५ इतकी आहे. याचाच अर्थ असा की, स्वयंरोजगार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.

७. एकूण ४८ लाभार्थ्यांना दिलेल्या एकूण १७ स्वयंरोजगाराच्या व्यवसायांपैकी १४ व्यवसाय पाहणीच्या वेळी कार्यान्वित आढळले तर ३ व्यवसाय सुरु होऊन काही कालावधीनंतर बंद पडले असल्याचे दिसून आले. बंद व्यवसायाचे प्रमाण अल्प आहे, असे दिसून येते. सदरील तीनही व्यवसाय धुळे जिल्हयातील आहेत. आर्थिक व व्यावसायिक अडचणी, व्यवसायातील तोटा इत्यादीमुळे व्यवसाय बंद पडल्याचे निदर्शनास आले.

८. एकूण लाभार्थ्यांपैकी, व्यवसाय प्रशिक्षण घेतलेले लाभार्थी १९ (३९ टक्के) आहेत. त्यातील ६ लाभार्थ्यांनी शासकीय संस्थामार्फत प्रशिक्षण घेतलेले आहे. तर उरलेल्या लाभार्थ्यांनी खाजगी संस्थामार्फत प्रशिक्षण घेतल्याचे आढळून आले. व्यवसायाचा पूर्वानुभव असलेले एकूण ९ लाभार्थी आहेत, तर व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेले २० लाभार्थी (४२ टक्के) असून त्यातील बहुतेक लाभार्थ्यांना प्रशिक्षणाची आवश्यकता वाटत नाही. उदा. किराणा दुकाने, स्वस्त धान्य दुकाने, सायकली भाड्याने देणे वगैरे.

९. पाहणीत निवडलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी बहुतेक लाभार्थ्यांचा कल अनुदानाचे प्रमाण जास्त असणाऱ्या योजना घेण्याकडे अधिक असल्याचे निदर्शनास आले. त्यात प्रामुख्याने न्युक्लिअस बजेट त्या खालोखाल खादी ग्रामोद्योग कार्यालयांच्या अनुदानाच्या योजनांचा उल्लेख करावा लागेल. आदिवासी विकास महामंडळातर्फे एकलव्य मिनि ट्रक योजना नुकतीच सुरु करण्यात आलेली आहे. लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग व कर्ज या योजनेत असून देखील स्वयंरोजगाराचे एक चांगले साधन म्हणून या योजनेस आदिवासी तरुणांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते. अनुदान जास्त प्रमाणात मिळावयास पाहिजे, यासाठी बहुतांश लाभार्थी आग्रही असल्याचे आढळून आले. कर्ज व अर्थसहाय्याच्या योजनांना प्रतिसाद देण्यास बहुतेक लाभार्थी नाखूष असतात, असे अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतुन समजले.

१०. व्यवसायाचा लाभ घेण्यापूर्वी रुपये ११,०००/- च्या वर वार्षिक उत्पन्न घेणारे १३ लाभार्थी होते. त्यांची टक्केवारी २७ टक्के इतकी आहे. व्यवसायाचा लाभ योजनेतील (अनुदान इ.चा लाभ) घेतल्यानंतर बऱ्याच लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन रु.११,०००/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न घेणारे एकूण ३४ (७१ टक्के) लाभार्थी झाल्याचे दिसून आले. म्हणजेच योजनेचा लाभ घेतल्यानंतर ४४ टक्के

लाभार्थींचे उत्पन्न वाढले. असे असले तरीही काही लाभार्थ्यांच्या उत्पन्नात मर्यादित वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले. त्याची मुख्य कारणे म्हणजे एका गांवात एकच व्यवसाय अनेकांकडून कार्यान्वित असणे, माल विक्री साठी योग्य बाजारपेठ नसणे, व्यवसाय कौशल्याचा अभाव व अनुभवाचे पाठबळ नसणे. पाहणी केलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी सुमारे २१ टक्के लाभार्थी हे योजनांचा लाभ घेण्यापूर्वीपासूनच व्यवसाय करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

**सर्वसाधारण निष्कर्ष :-**

(१) जिल्हा उद्योग केंद्र

१. बँकेकडून कर्जाची रक्कम लाभार्थ्यांस मिळाल्यानंतर साधारणतः दुसऱ्याच महिन्यापासून बँकेच्या कर्जवसुलीस प्रारंभ होतो. तसेच कर्ज वसुलीच्या हप्त्याची रक्कम देखील मोठी असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

२. बँकेकडून कर्ज मंजूरीस विलंब लागतो, असे लाभार्थ्यांनी दिलेल्या माहितीवरुन निदर्शनास आले.

३. असे निदर्शनास आले की, काही लाभार्थ्यांना जिल्हा उद्योग केंद्र व बँकेकडून दिले गेलेले कर्ज प्रकल्पाच्या प्रस्तावित खर्चानुसार दिले गेले नसल्याने लाभार्थ्यांना प्रचलित किंमतीनुसार व्यवसाय सामुग्रीची खरेदी करता येणे शक्य झाले नाही.

४. बीज भांडवल कर्जाचा वसूली कालावधी साधारणतः ३ वर्षानंतरचा असल्याने सदर कालावधी योग्य वाटतो, असे बहुतांश लाभार्थ्यांशी झालेल्या चर्चेतून दिसून आले.

५. बीज भांडवल कर्जांतर्गत व्यवसाय सुरु करणाऱ्या लाभार्थ्यांला 'सेकंड डीड ऑफ हायपोथीकेशन'चा खर्च येतो. व्यवसायाचे रजिस्ट्रेशन करतांना बीज भांडवल कर्जाच्या सुमारे ४ टक्के एवढा खर्च त्यासाठी लाभार्थ्यांला करावा लागतो. बीज भांडवल कर्जाची वसूली करण्यासाठी 'सेकंड डीड ऑफ हायपोथीकेशन' आवश्यक आहे, असे अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेतून समजले.

६. बीज भांडवलाच्या रक्कमेचे वाटप १९९३ पूर्वी विभागीय महाराष्ट्र विकास महामंडळामार्फत केले जात होते. परंतू १९९३ नंतर सदरच्या रक्कमेचे वाटप जिल्हा उद्योग केंद्रामार्फतच सुरु करण्यात आले आहे. जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत एकूण ९ लाभार्थ्यांनी ७ व्यवसायांचा लाभ घेतलेला आहे.

७. वेगवेगळी कार्यालये/संस्था यांचेमार्फत राबविल्या जाणाऱ्या समान योजनांची अंमलबजावणी करतांना नियमात सारखेपणा आढळून येत नाही, असे अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी

सांगितले. त्यामुळे लाभार्थ्यांस ज्या योजनेचे आर्थिक सहाय्य वा अनुदान जास्त प्रमाणात मिळते, त्या कार्यालयातील योजनांचा लाभ घेण्याकडे त्यांचा कल दिसून येतो.

८. जिल्हा उद्योग केंद्रा अंतर्गत आदिवासी लाभधारकांसाठी देण्यात येणारा निधी हा वर्षाच्या सुरवातीलाच देण्यात येतो. पण काही वेळा हा निधी अपूरा पडल्याने जास्त रक्कमेची मागणी केली जाते. ती प्राप्त होण्यास विलंब होण्याची शक्यता असते व त्या दरम्यान अर्थसहाय्यासाठी लाभार्थ्यांस प्रतिक्षा करावी लागते व पर्यायाने प्रकरणांस बराच विलंब होतो असेही अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी चर्चेच्या दरम्यान सांगितले.

९. सन १९९२-९३ या वर्षात जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली अंतर्गत बीज भांडवल योजनेखाली ५ आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असताना ११ आदिवासी लाभार्थ्यांनी योजनेचा फायदा घेतला आहे. मात्र १९९३-९४ या वर्षात या योजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्य व साध्य दिले नसल्याचे आढळून येते. धुळे जिल्हयातील जिल्हा उद्योग केंद्राअंतर्गत सन १९९२-९३ या वर्षात ३ आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असून १७ आदिवासी लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. तर सन १९९३-९४ या वर्षात ११ आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असताना ८ आदिवासी लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. जिल्हा उद्योग केंद्राअंतर्गत धुळे व गडचिरोली जिल्हयात सन १९९२-९३ या वर्षात बीजभांडवल योजनेखाली ठरवून दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा जास्त आदिवासी लाभार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेतलेला आहे. तर १९९३-९४ या वर्षात गडचिरोली जिल्हयात बीजभांडवल योजनेचा लाभ एकाही आदिवासी लाभार्थ्यांस मिळालेला नाही, असे आढळून येते. थोडक्यात या वर्षात वार्षिक लक्ष्य व साध्य ठरविली आहेत, असे जाणवत नाही. मात्र धुळे जिल्हयात सन १९९३-९४ या वर्षात बीजभांडवल योजनांचा ठरवून दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा कमी प्रमाणात आदिवासी लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याचे दिसून येते.

सदरहू योजनांचा आदिवासी लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे प्रमाण इतर योजनेच्या तुलनेने कमी आहे, असे अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी झालेल्या अनौपचारिक गप्पांतून निष्पन्न झाले. कारण बीजभांडवल ही कर्जाची योजना आहे व लाभार्थ्यांचा कल हा अनुदानाच्या योजनांचा लाभ घेण्याकडे जास्त असतो. तसेच या योजनेमुळे 'सेकंड डीड ऑफ हायपोथीकेशन' चा येणारा खर्च, लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग या गोष्टीमुळे या योजनांना आदिवासी लाभार्थ्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. तथापि, ज्या आदिवासी लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यातील काही लाभार्थ्यांनी व्यवसाय सुरु करुन प्रगती केल्याचे आढळून आले. उदा.गॅस एजन्सी, किराणा दुकान, थ्रेझर मशीन व प्रिंटींग प्रेस इत्यादी व्यवसाय करणाऱ्यां लाभधारकांचा या ठिकाणी उल्लेख करता येईल. मात्र धुळे जिल्हयात बीजभांडवलाचे अर्थसहाय्य घेणाऱ्या एका लाभार्थ्यांचा व्यवसाय सुमारे १ वर्षापासून बंद

असल्याचेही पाहणीत आढळून आले. व्यावसायिक बाबींकडे केलेल्या दुर्लक्षामुळे व्यवसायाचे नुकसान झाल्याचे लाभार्थ्यांशी झालेल्या चर्चेतून समजले.

२. आदिवासी विकास महामंडळ (प्रादेशिक कार्यालये)

आदिवासी विकास महामंडळामार्फत सुशिक्षित बेकार तरुणांना 'स्वयंरोजगाराचे साधन' म्हणून सुरु करण्यात आलेली 'एकलव्य मिनीट्रक ' योजना ही एक अत्यंत चांगली योजना आहे. तथापि, त्यातील काही त्रुटी दूर झाल्यास ही योजना अधिक प्रभावीपणे कार्यरत होण्यास निश्चितच मदत होईल, असे वाटते. आढळून आलेल्या त्रुटींचा उहापोह खाली नमूद केला आहे.

(१) आदिवासी विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगारासाठी देण्यात आलेल्या मिनी ट्रकचे सुटे भाग स्थानिक स्तरावर तसेच जिल्हास्तरावरही सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. त्यासाठी लाभार्थ्यांना दूर अंतरावरील मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागते. सुट्या भागांअभावी लाभार्थ्यांच्या वाहतूक व्यवसायावर आर्थिक परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले.

(२) इन्शुरन्स कंपनीकडून मिनीट्रक लाभार्थ्यांना योग्यते सहकार्य मिळत नाही, असे लाभार्थ्यांनी सांगितले. वाहनास अपघात झाल्यास किंवा काही दुर्घटना ओढवल्यास वाहन दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाची संपूर्ण रक्कम सुरवातीला लाभार्थ्यांस भरावी लागते व इन्युरन्स कंपनी संबंधित लाभार्थ्यास नंतर पैसे अदा करते. वाहनास अपघात झाल्याने लाभार्थी आधीच मानसिकदृष्ट्या खचलेला असतो. त्यातच भर म्हणून त्यास वाहन दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाची तजवीज करावी लागते.

(३) मिनीट्रक कंपनीतर्फे (Mahindra & Mahindra ) लाभार्थ्यांना हवे तेवढे सहकार्य मिळत नाही, असे लाभार्थीशी केलेल्या चर्चेतून निदर्शनास आले. वाहनाच्या गॅरंटी कालावधीत देखील खराब झालेल्या सुट्या भागांसाठी पैशाची आकरणी कंपनीकडून केली जाते, असे लाभार्थ्याचे म्हणणे आहे.

(४) लाभार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या 'मिनीट्रक' वारंवार नादुरुस्त होतात. तसेच आदिवासी भागातील रस्ते व दुर्गम गांवांचा विचार करता सदर कंपनीच्या मिनीट्रक्स वाहतूकीसाठी पाहिजे त्या प्रमाणात फायदेशीर ठरु शकत नाहीत, असे बहुतेक लाभार्थ्यांशी झालेल्या चर्चेतून व अनौपचारिक गप्पांतून निष्पन्न झाले.

(५) मिनीट्रक साठी दिले जाणारे कर्जावरील व्याजाचा दर (६ टक्के) आहे तो थोडासा जास्त आहे, असे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.

(६) आदिवासी विकास महामंडळामार्फत दिले जाणारे माल वाहतूकीचे दर ट्रक व मिनीट्रकसाठी सारखेच असल्याचे निदर्शनास आले. सदरचे दर मिनीट्रक लाभधारकांना परवडत नाहीत. कारण

मिनीट्रक ट्रकच्या मानाने कमी वाहतूक क्षमता असलेले वाहन आहे. ट्रकची मालवाहतूक क्षमता जास्त असल्याने ते दर त्यांना परवडतात. तसेच मालवाहतुकीच्या दरातच मालचढाई व उतराईचे दर समाविष्ट असल्याने त्यातही मिनीट्रक असणाऱ्या लाभार्थ्यांचे नुकसान होते, असे आढळून आले आहे.

(७) लाभधारकांना मिनीट्रक ताब्यात मिळाल्यानंतर साधारणत: २ ते ३ महिन्यांनी कर्जाच्या हप्ते वसूलीस प्रारंभ होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नफ्यातूनच कर्जाची परतफेड केली जाते. परंतू वाहतुकीच्या व्यवसायातून नियमितपणे उत्पन्न न मिळाल्यास कर्जाचे हप्ते थकतात. त्यातून वाहनास कांही दुर्घटना झाल्यास लाभार्थी कर्जबाजारी होण्याचा प्रसंग उद्‌भवण्याची शक्यता असते. पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांचा कर्जाचा पहिला व दुसरा हप्ता बाकी असल्याचे आढळून आले आहे.

(८) या योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांपैकी एक आवश्यक कागदपत्रे म्हणजे 'सुशिक्षित बेरोजगारांचा दाखला' होय. बऱ्याच वेळा हे कागदपत्र मिळण्यासाठी विलंब होतो, असे लाभार्थ्यांकडून सांगण्यात आले.

(९) सन १९९३-९४ या आर्थिक वर्षात या योजनेअंतर्गत प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, धुळे व गडचिरोली यांचेमार्फत पुढे नमूद केलेल्या लक्ष्यांकाप्रमाणे उदिष्टयपूर्ती झालेली आढळून येते. नंदूरबार, जि.धुळे येथील प्रादेशिक कार्यालय आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत सन १९९३-९४ या वर्षी १२ लाभार्थ्यांचे लक्ष्यांक होते व त्यानुसार १२ लाभार्थ्यांचे उदिष्टयपूर्ती झालेली आहे तर प्रादेशिक कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ, गडचिरोली अंतर्गत १६ लाभार्थ्यांचे लक्ष्यांकाप्रमाणे १६ लाभार्थ्यांची उदिष्टयपूर्ती वरील वर्षात झालेली आहे. तसेच पाहणी केलेल्या ९ लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत स्वयंरोजगार उपलब्ध झालेला आहे.

(१०) पाहणीतील बहुतेक लाभार्थ्यांचा म्हणण्याचा कल असा दिसून आला की, बाजारपेठेत वाहतूक व्यवसायाची हमी नसल्याने उत्पन्नात सातत्यता नाही. म्हणून त्यांना सदैव व्यवसायाच्या विवंचनेत हिंडावे लागते. कधीकधी पुरेश्या उत्पन्नाअभावी कर्जाचे हप्ते देखील फेडले जात नाहीत.

३. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालय)

(१) बँकेमार्फत पैसे मिळण्यास विलंब होतो, असे लाभार्थ्यांनी निदर्शनास आणून दिले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व वरील कार्यालयामध्ये प्रकरण मंजूरीस विलंब होतो, ही सर्वसाधारण कारणे आहेत.

(२) ग्रामीण कारागिर संस्थांच्या सभासदांना मिळणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर जास्त आहे, असे आढळून आले आहे.

(३) ग्रामीण कारागिर संस्थांच्या सभासदांना अनुदान व कर्जाच्या आर्थिक व्यवहाराबाबत नेमका उलगडा झाला नसल्याचे दिसून आले, त्यामुळे नेमके कर्ज किती व अनुदान किती मिळाले, याबाबत निश्चित स्वरुपाची माहिती त्यांना असल्याचे दिसून येत नाही.

(४) ग्रामीण कारागिर संस्थांचे काही सभासद उत्पादित मालाची विक्री स्वत:मार्फतच करीत असल्याचे निदर्शनास आले.

(५) काही लाभार्थी पैशाचा योग्य वापर करीत नसल्याने कर्जाचे थकबाकीदार राहतात, असे बँक अधिकाऱ्यांनी चर्चेतून सांगितले. तसेच कर्जाच्या प्रकरणांना आदिवासी लाभार्थ्यांकडून योग्य तो प्रतिसाद देखील मिळत नाही, असेही बँक अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणले.

(६) काहीवेळा योजनेअंतर्गत मिळालेल्या वस्तुंचा वापर लाभार्थ्यांकडून नीट केला जात नाही, असे निदर्शनास आले आहे. उदा. नंदूरबार तालुक्यातील सुतारकाम करणाऱ्या लाभार्थ्याकडे योजनेद्वारा मिळालेले लाकूड कटाई मशीनचे पाते ( ब्लेड ) खराब झाल्याने त्याचा वापर होत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर लाभार्थी जुन्या पध्दतीनेच लाकडाची कटाई करीत असल्याचे दिसून आले.

(७) खादी ग्रामोद्योग कार्यालय, धुळे व गडचिरोलीमार्फत लाभार्थ्यांचे व्यवसायासाठी (अनुक्रमे मिरची कांडप यंत्र व लोहार कामाचे मशीन) काही प्रमाणात कर्ज व अनुदान या तत्वावर दिलेले आहे. मात्र वस्तु लाभ मिळूनही सदरची युनिट्स पाहणीच्या वेळी कार्यान्वित नसल्याचे दिसून आले. त्यामुळे ३३०००+३००००= ६३००० रुपये एवढ्या निधीच्या गुंतवणुकीचा उद्देश सफल झालेला आहे, असे दिसून येत नाही. वीज कनेक्शन न मिळणे तसेच व्यावसायिक अडचणीमुळे सदर युनिटस कार्यान्वित होऊ शकले नाहीत, असे या लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.

(८) जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, धुळे अंतर्गत सन १९९२-९३ व १९९३-९४ या वर्षात या योजनेसाठी आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक ठरवून देण्यात आले असून ठरवून दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा दुप्पट प्रमाणात उदिष्टये साध्य झालेली आहेत, असे पुढील माहितीवरुन निदर्शनास येते.

सन १९९२-९३ या वर्षात जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालय, धुळे अंतर्गत ६ आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असून २० आदिवासी लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर १९९३-९४ या वर्षात ६ आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असताना ३३ आदिवासी लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. मात्र जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय गडचिरोली अंतर्गत सन १९९२-९३ या वर्षात ४० आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असताना फक्त १० आदिवासी लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे तर १९९३-९४ या वर्षात आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक व उदिष्टये यांची माहिती निरंक आढळते.

सन १९९२-९३ या वर्षात जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी गडचिरोली अंतर्गत या योजनेसाठी आदिवासी लाभार्थ्यांसाठी ठरवून दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा बऱ्याच कमी प्रमाणात उदिष्टचे साध्य झालेली आहेत तर १९९३-९४ या वर्षात या योजनेअंतर्गत एकाही आदिवासी लाभार्थ्यास या योजनेचा लाभ मिळालेला नाही, असे उपलब्ध कागदपत्रावरुन निदर्शनास येते. वेगळया शब्दात सांगावयाचे झाल्यास, या वर्षात योजनेसाठी आदिवासी लाभार्थींचे वार्षिक लक्ष्य व साध्य ठरविली आहेत, असे दिसून येत नाही. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालयांतर्गत पाहणीतील एकूण १० लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे.

## ४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय

*केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट योजना)*

(१) 'न्युक्लिअस बजेट' ही योजना ५० टक्के, ८० टक्के व १०० टक्के अनुदानाची योजना असल्याने व या योजनेत कर्ज प्रकार नसल्याने या योजनेस अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्याकडून मिळणारा प्रतिसाद चांगला आहे, असे आढळून येते. तसेच, या योजनेअंतर्गत प्रकरण मंजूरीसही फारसा विलंब लागत नाही. परंतु न्युक्लिअस बजेट अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाची मर्यादा कमी आहे, असे बहुतेक लाभार्थ्यांनी पाहणीच्या वेळी सांगितले.

(२) बेफिकीरी वृत्तीमुळे न्युक्लिअस बजेट अंतर्गत मिळालेल्या अनुदानाचा काही लाभार्थ्यांनी योग्यप्रकारे फायदा करुन घेतला नाही, असे पाहणीत आढळून आले. त्यामुळे दिलेल्या लाभापासून कष्ट घेऊन उत्पन्न न काढता मजूरी किंवा शेतीकडे वळणे, व्यवसाय अर्धवट सोडणे किंवा काही कालावधीकरिताच व्यवसाय करणे इ.प्रकार उद्‌भवल्याचे दिसून येते.

(३) या योजनेअंतर्गत बहुतांश लाभार्थ्यांना योजनेपासून फायदा झाल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार, जि.धुळे येथील जनरल स्टोअर्स, स्वस्त धान्य दुकान तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत घड्याळ दुरुस्तीच्या दुकानासाठी केलेले अर्थसहाय्य ही त्याची उदाहरणे होत. 'न्युक्लिअस बजेट' अंतर्गत अर्थसहाय्यावर उपरोक्त लाभार्थ्यांनी बऱ्याच प्रमाणात आपणासं आर्थिक फायदा झाला, असे सांगितले. मात्र घड्याळ दुरुस्तीच्या दुकानाची जागा शहराच्या एका टोकास असल्याने व्यवसायाच्या दृष्टीने सदर जागा पाहिजे त्या प्रमाणात उपयुक्त वाटत नाही, असे दिसून आले.

(४) 'न्युक्लिअस बजेट' योजनेतून काही ठिकाणी एकाच व्यवसायासाठी एकापेक्षा जास्त लाभधारकांना अनुदान दिलेले आहे किंवा वस्तु लाभ देण्यात आलेला आहे. उदा.किराणा दुकानांना अर्थसहाय्य (नंदूरबार) शिलाई यंत्र वाटप (गडचिरोली) इत्यादी एकाच गांवात एकाच व्यवसायाची

एकापेक्षा जास्त दुकाने असल्याने व्यवसायात स्पर्धा निर्माण होऊन व्यवसायावर परिणाम होतो. तर एकापेक्षा जास्त लाभधारकांना एकाच गांवात शिलाई यंत्राचे वाटप झाल्याने शिलाई व्यवसाय तितकासा चालत नाही. त्यातच गांवाची लोकसंख्या कमी असल्याने गिऱ्हाईकही कमी मिळते, असे लाभार्थींनी सांगितले.

(५) सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार, जि.धुळे कार्यालयामार्फत उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजनेअंतर्गत लक्ष्यांकापेक्षा जास्त प्रमाणात उदिष्टयपूर्ती झालेली आहे. तर १९९३-९४ या आर्थिक वर्षात लक्ष्यांकापेक्षा थोड्या कमी प्रमाणात उदिष्टयपूर्ती झाल्याचे पुढील माहितीवरुन दिसून येते. सन १९९२-९३ या वर्षात प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार अंतर्गत ८४ लाभार्थ्यांच्या लक्ष्यांकापैकी ८८ लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. तर १९९३-९४ या वर्षात १६६ लाभार्थ्यांचे लक्ष्यांक असताना १४२ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत संदर्भीय वर्षात या योजनेस लाभार्थींचा मिळालेला प्रतिसाद चांगला आहे, असे उपलब्ध माहितीवरुन आढळून येते. सदर योजनेअंतर्गत पाहणीतील एकूण २० लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे व वेगवेगळे ९ व्यवसाय लाभार्थ्यांनी सुरु केल्याचे आढळून आले आहे.

# प्रकरण क्र.६

## सूचना तथा शिफारशी

स्वयंरोजगाराच्या उत्पन्न निर्मितीच्या योजना संदर्भात खालीलप्रमाणे सूचना तथा शिफारशी करण्यात येत आहेत.

**सर्वसाधारण सूचना :-**

१. तांत्रिक व्यवसाय व त्या अनुषंगाने इतर काही व्यवसाय करणाऱ्या (उदा.सुतारकाम, लोहारकाम, घड्याळ दुरुस्ती वगैरे) लाभार्थ्यांना व्यवसायाचे प्रशिक्षण दिले गेल्यास उचित होईल, असे वाटते. किंबहुना अशा स्वरुपाचा व्यवसाय स्विकारण्यापूर्वी / सुरु करण्यापूर्वी संबंधित व्यक्तींना सदरील व्यवसायातील प्रशिक्षण सक्तीचे करणे आवश्यक वाटते. कारण काही लाभार्थ्यांना जरी व्यवसायाचा पूर्वानुभव असला तरी सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करुन व्यवसाय करण्याची कला अवगत नसते. यासाठी कमीत कमी ३ ते ४ महिन्यांचे त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. सदरील प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण अनुदान देण्यात यावे. तसेच प्रशिक्षण वर्ग शक्यतो लाभार्थ्यांच्या गांवापासून फार दूर अंतरावर नसावेत.

२. पाहणीत काही लाभधारकांचा व्यवसाय काही कालावधीनंतर बंद पडल्याचे दिसून आले. व्यवसाय बंद पडण्याची मुख्य कारणे आर्थिक, व्यावसायिक, व्यवसाय कौशल्याचा व अनुभवाचा अभाव, व्यवसायात तोटा होणे, व्यवसायासाठी आवश्यक तेवढे कष्ट न घेणे, इत्यादी संभवतात. यासाठी कोणताही व्यवसाय सुरु करण्यापूर्वी सर्वप्रथम व्यवसायातील जोखीम पत्करण्याची मानसिक तयारी लाभार्थ्यांत निर्माण व्हायला पाहिजे. त्याचबरोबर अपयशाच्या भितीने स्वयंरोजगाराकडे न वळणाऱ्यांचे मत परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. व्यावसायिक धाडस करण्यासाठी व तोटा आलाच तर तो सहन करण्यासाठी जी मानसिक तयारी लागते ती त्यांच्यात निर्माण केल्यास व्यवसाय यशस्वी होण्यास बरीच मदत होईल. यासाठी व्यवसाय प्रशिक्षणाबरोबरच या सर्व बाबी व्यवसाय सुरु करणाऱ्यांच्या मनावर सुरवातीलाच बिंबविल्यास व्यवसायातील संभाव्य आव्हानांना व अडीअडीचणींना ते व्यवस्थितरित्या सामोरे जाऊ शकतील. थोडक्यात, स्वयंरोजगारासाठी जो आत्मविश्वास निर्माण होणे गरजेचे आहे, तो याद्वारे निर्माण करता येऊ शकेल. म्हणून जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण केंद्र किंवा ज्या कार्यालयामार्फत हे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. त्या कार्यालयामार्फत युवकांची अशी मनोवृत्ती तयार केली गेली पाहिजे. शिवाय व्यवसायातील अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे, व्यावसायिकाने व्यवसायाच्या बाबतीत स्वत: दक्ष राहिले पाहिजे. त्याचबरोबर,

व्यवसायासाठी कष्ट करण्याची त्याची तयारी असली पाहिजे. यशस्वी व्यवसायाचे हेच मर्म आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दौऱ्याच्या वेळी अशाप्रकारचे मार्गदर्शन व्यावसायिकांना केल्यास स्वयंरोजगाराच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास निश्चित मदत होईल.

३. नोकरीच्या स्वरुपात सर्वांना रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याने आदिवासी भागातील सुशिक्षित तरुणांना स्वयंरोजगाराकडे वळविणे आवश्यक आहे. त्यासाठी पुरेशा प्रमाणात उद्योग व्यवसाय आदिवासींसाठी राखून ठेवणे गरजेचे आहे. अशा उद्योगांची एक यादी तयार करण्यात यावी व आदिवासी भागात आदिवासी तरुणांकडूनच हे उद्योग सुरु केले जावेत, यासाठी आवश्यक त्या शिक्षण व प्रशिक्षणाची सुविधा आदिवासी भागातील शैक्षणिक संस्थामध्येच करणे गरजेचे वाटते.

४. आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेने कमी आहे. आदिवासींच्या विकासासाठी शासनामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जात आहेत, त्या समजून घेण्यासाठी व त्या योजनांचा योग्य तऱ्हेने लाभ घेण्यासाठी आदिवासी समाजात सुशिक्षितांचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. यासाठी आदिवासी भागातील स्वयंसेवी संस्था तसेच शासनाच्या शिक्षण विभागामार्फत विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे झाल्यास, शिक्षित आदिवासी तरुणांना योजनांची व्यवस्थित माहिती होऊन विविध योजनांचा ते योग्यप्रकारे लाभ घेऊ शकतील.

५. प्रत्येक जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार तेथे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीनुसार तसेच लोकांच्या गरजानुसार स्वयंरोजगाराचे व्यवसाय सुरु करण्यात यावेत. उदा.धुळे जिल्हयात खालील स्वयंरोजगाराचे व्यवसाय सुरु करता येतील.

**प्लॅस्टिक कोन्स, लाकडी व लोखंडी फर्निचर, साखर कारखान्यासाठी लागणाऱ्या फेब्रीकेटेड वस्तु, रोलींग शटर्स, कागदी पिशव्या, पेपर बोर्डस, रजिस्टर्स, फाईल कव्हर्स, बुक बाईंडिंगची कामे,** जूटगनी बॅग्ज, पशुखाद्य, खडी, विटा, उस तोडणीस लागणारे कोयते, लाकडी बॉबीन्स, प्लॅस्टिक बॉबीन्स, पादत्राणे बनविणे इत्यादी तर गडचिरोली जिल्हयात सुरु करता येऊ शकतील, असे व्यवसाय पुढीलप्रमाणे आहेत. राईस मील, लाकडी फर्निचर बनविणे, विटा बनविणे, सुतारकाम, रेशीम उद्योग, वेतबांबूपासूनची उत्पादने, डिंक उद्योग, लाकडांवरील कलाकुसरी, सॉ मिल्स, फोटोग्राफी, एस.टी.डी.पी.सी.ओ., वनस्पती औषधी संकलनाचा उद्योग इत्यादी उद्योगांचा उल्लेख करता येईल.

६. वेगवेगळी कार्यालये/संस्था यांच्यामार्फत स्वयंरोजगाराच्या राबविल्या जाणाऱ्या समान योजनांच्या नियमात सारखेपणा असणे आवश्यक आहे. असे केल्यास विशिष्ट कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचाच लाभ घेण्याच्या आदिवासी लाभार्थ्यामधील प्रवृत्तीस आळा बसेल.

७. नोकरीपेक्षा स्वत:चा व्यवसाय करणे कसे फायदेशीर आहे हे सुशिक्षित आदिवासी तरुण-तरुणींना पटवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी निरनिराळी प्रसार माध्यमे, वृत्तपत्रे, स्वयंसेवी संस्था इत्यादी महत्वाची भूमिका बजावू शकतात. असे झाल्यास, एका बाजूला नोकऱ्यावरील ताण कमी होईल तर दुसऱ्या बाजूला उत्पादन व उत्पन्न वाढीस चालना मिळेल.

८. स्वयंरोजगार स्विकारणाऱ्या तरुणांच्या अभ्याससहली आयोजित करण्यात याव्यात. ज्याद्वारे विविध व्यवसायांना प्रत्यक्ष भेटी देऊन व्यवसायाचे ज्ञान, कौशल्य त्यांना जाणून घेता येईल व त्याच्या आधारे स्वयंरोजगार स्विकारणाऱ्या तरुणांना स्वत:ची आर्थिक उन्नती साध्य करणे शक्य होऊ शकेल.

## जिल्हा उद्योग केंद्राशी निगडीत सूचना

१. बीजभांडवल योजनेअंतर्गत बँकेकडून लाभधारकास मिळणाऱ्या कर्जाच्या रक्कमेची वसूली तात्काळ सुरु करु नये. कर्जफिडीस पुरेसा कालावधी (सुमारे १० ते १२ महिने) व्यवसायधारकास दिला गेल्यास प्राप्तीस वाव मिळून कर्ज परतफेड करणे व्यवसाय धारकास सोयीचे होईल. त्याचप्रमाणे बँक कर्ज वसूलीच्या हप्त्याची रक्कम देखील कमी असावी, म्हणजे लाभधारकास कर्जहप्त्याचा बोजा वाटणार नाही.

२. बँकेकडून व्यवसाय धारकांना द्यावयाच्या कर्ज प्रकरणांना शक्य तेवढ्या कमी कालावधीत मंजूरी प्रदान केल्यास व्यवसाय निर्मितीसाठी होणारा विलंब टाळता येऊ शकेल व व्यवसायधारकांना नियोजित वेळेत व्यवसाय सुरु करणे शक्य होईल.

३. व्यवसायधारकांनी व्यवसायासाठी प्रस्तावित केलेल्या प्रकल्प खर्चाच्या आराखड्यानुसार कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात यावीत. त्यादृष्टीने बँक अधिकाऱ्यांनी प्रयत्नशील असावे. त्याचप्रमाणे कर्ज मंजूर करतांना प्रचलित बाजारभावानुसार व वस्तुंच्या वाढीव किंमत ग्राह्य धरुन कर्जप्रकरणे मंजूर केल्यास ते जास्त संयुक्तिक ठरेल, असे वाटते.

४. बीज भांडवल योजनेअंतर्गत व्यवसायासाठी 'सेकंड डीड ऑफ हायपोथिकेशन' करिता येणारा खर्च करण्याची आर्थिक कुवात आदिवासी लाभधारकात नसते. यासाठी बीजभांडवल अंतर्गत सदरची रक्कम आदिवासी लाभधारकांना सूट म्हणून देण्यात यावी. यासाठी कुठल्याही रक्कमेची आकारणी न करता व्यवसायाचे रजिस्ट्रेशन झाल्यास ते योग्य होईल.

५. वेगवेगळी शासकीय कार्यालये/संस्था यांचेमार्फत राबविल्या जाणाऱ्या समान योजनांच्या नियमात सारखेपणा असावा. त्यामुळे वेगवेगळया शासकीय कार्यालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या आदिवासी लाभार्थींच्या संख्येत फारशी तफावत पडणार नाही.

६. स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल योजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थींचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे. ही योजना कर्जाची योजना असून त्यात अनुदानाचा समावेश नाही. शिवाय 'सेकंड डीड ऑफ हायपोथिकेशन' साठी येणारा खर्च आहे. त्यामुळे या योजनेकडे आदिवासी लाभधारकांचा फारसा कल नाही, असे अंमलबजावणी अधिकाऱ्याशी झालेल्या चर्चेतून समजले. यासाठी बीजभांडवल कर्जातंर्गत कर्जाच्या निम्मी रक्कम आदिवासी लाभधारकांना अनुदान म्हणून दिल्यास या योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांचा प्रतिसाद वाढण्यास मदत होईल.

७. बीज भांडवलासाठी पुरेशा निधीची मागणी आर्थिक वर्षाच्या सुरवातीलाच केल्यास या योजनेसाठी निधी अपूरा पडणार नाही, असे वाटते. लक्ष्यांकापेक्षा जास्त आदिवासी लाभधारक या योजनेचा लाभ घेऊ इच्छित असल्यास अशा संभाव्य लाभधारकांची संख्या (दरवर्षी येणाऱ्या अर्ज प्रकरणावरुन) गृहित धरुन त्याप्रमाणे अगदी सुरवातीलाच वाढीव निधीचा अंदाज घेऊन मागणी करुन निधी प्राप्त केल्यास ही अडचण कमी होऊ शकते. तसेच वरिष्ठ कार्यालयामार्फत देखील यासाठी जादा निधी सुरवातीलाच उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे.

## आदिवासी विकास महामंडळा संदर्भातील सूचना

१. आदिवासी विकास महामंडळामार्फत पुरविण्यात आलेल्या मिनीट्रकचे सुटे भाग प्रत्येक जिल्हा मुख्यालय व शक्य झाल्यास तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे लाभार्थींचे श्रम, वेळ व पैसा यांची बचत होऊ शकेल. तसेच वाहनाच्या सुट्या भागांअभावी लाभार्थ्यांच्या वाहतूक व्यवसायावर होणारा आर्थिक परिणाम टाळता येऊ शकेल.

२. वाहनाच्या हमी कालावधीत (गॅरेंटी पिरियड) निकामी अथवा नादुरुस्त होणाऱ्या वाहनाच्या सुट्या भागासाठी कंपनीने लाभधारकांकडून पैसे घेऊ नयेत. ते विना आकारणी तत्वावर द्यावेत. तसेच इन्शुरन्स कंपनीने संबंधित मिनीट्रक लाभधारकांना योग्य ते सहकार्य देणे अपेक्षित आहे. वाहनांस अपघात झाल्यास किंवा दुर्घटना ओढवल्यास लाभधारकास आर्थिक संकटस तोंड द्यावे लागते. म्हणून अशा वाहनाच्या दुरुस्तीसाठी येणाऱ्या एकूण खर्चाच्या किमान ७० टक्के इतकी रक्कम इन्युरन्स कंपनीने स्वत: भरावी करावी व उर्वरित ३० टक्के रक्कम लाभार्थ्यांनी भरावी. दुरुस्तीसाठी येणाऱ्या

खर्चाचे प्रमाण अशारितीने ठरविले गेल्यास लाभार्थी त्याचप्रमाणे इन्शुरन्स कंपनी हया दोघांवरील आर्थिक बोजा कमी होईल.

३. सर्व विभागात व सर्व लाभार्थ्यांना एकाच प्रकारची वाहने वाटणे उचित वाटत नाही. यासाठी आदिवासी भागातील भौगोलिक परिस्थिती, दळणवळणाच्या रस्त्यांची स्थिती, तसेच लाभार्थ्यांची आर्थिक कुवत इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार वाहने लाभधारकास मिळावीत, असे वाटते.

४. आदिवासीची आर्थिक परिस्थिती विचारात घेता मिनीट्रक साठी दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर सध्याच्या दरांपेक्षा कमी असावा.

५. आदिवासी विकास महामंडळामार्फत दिले जाणारे मालवाहतूकीचे दर मिनीट्रकसाठी वेगळे असावेत. किंबहुना ते वाढूवन मिळावेत. मिनीट्रकच्या वाहतूकीच्या दरात माल चढविणे व उतरविणे यासाठी वेगळे दर असावेत, म्हणजे कमी वाहतूक क्षमतेच्या मिनीट्रक लाभधारकांना या व्यवसायपासून बऱ्यांपैकी आर्थिक फायदा होऊ शकेल.

६. मिनीट्रकसाठी दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या वसूलीस तावडतोब २/३ महिन्यात सुरवात न करता साधारणत: एक वर्षानंतर प्रारंभ व्हावा, ज्या योगे हया कालावधीत व्यवसायातील प्राप्तीच्या रक्कमेतून लाभार्थींना कर्जाची परतफेड करता येऊ शकेल. त्याचप्रमाणे आकस्मिक उद्‌भवणाऱ्या आपत्तीच्या प्रसंगीही त्यांना आर्थिक अडचण भासणार नाही.

७. या योजनेसाठी आवश्यक असणारा सुशिक्षित बेरोजगाराचा दाखला संबंधित कार्यालयाकडून त्वरीत मिळाल्यास योजनेचा लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळता येऊ शकेल. किंबहुना ज्या कार्यालयात सुशिक्षित बेरोजगारांच्या नांवाची नोंदणी झाली असेल त्याच कार्यालयामार्फत सदरचा दाखला दिला गेल्यास उचित होईल.

८. मिनीट्रक वाहतूक व्यवसायात उत्पन्नाची हमी राहण्यासाठी वाहतूक व्यवसायाची बाजारपेठ उपलब्ध करुन दिल्यास लाभधारकांना जास्तीत जास्त कामधंदा मिळू शकेल. त्यासाठी लाभधारकांची संघटना बनवून त्यांना मालाची ऑर्डर दिली जावी. शक्य झाल्यास वाहतूक व्यवसायाचे स्वतंत्र कार्यालय निर्माण करुन त्यामार्फत बुकींग पध्दतीने माल वाहतूकीची ऑर्डर देण्यात यावी. त्यासाठीचे दर निश्चित करण्यात यावेत. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या निमित्ताने होणारी घरसामानाची वाहतूक, आश्रमशाळांना होणारा अन्नधान्य पुरवठा, तसेच शासकीय कार्यालयांशी संबंधित वाहतूकीची कामे इत्यादी कामे शासनामार्फत या व्यवसायधारकांना देण्यात यावी. थोडक्यात शासनानेच वाहतूक

व्यवसायाच्या बाजारपेठेची हमी घेऊन लाभार्थ्याच्या व्यवसायात उत्पन्नाची हमी दिल्यास ही योजना अधिक प्रभावी होऊ शकेल.

## खादी ग्रामोद्योग मंडळ संदर्भातील सूचना

१. बँक कर्जप्रकरण लवकर मंजूर होण्यासाठी अंमलबजावणीअधिकारी, बँक अधिकारी व वरिष्ठ कार्यालयातील कर्ज मंजूर करणारे अधिकारी यांच्यात समन्वय असणे आवश्यक वाटते. परस्पर समन्वयाने कर्ज प्रकरणेही तातडीची कामे समजून त्यास प्राधान्य दिल्यास कर्ज प्रकरणांचा लवकर निपटारा होऊन इच्छुकांना लवकर कर्ज मिळू शकेल.

२. ग्रामीण कारागिर/संस्थांची आर्थिक कुवात लक्षात घेता संस्थांना बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर कमी केला जावा.

३. ग्रामीण कारागिर संस्थांच्या सभासदांना कर्ज व अनुदानाच्या रक्कमेचा नेमका [illegible] होत नाही. यासाठी संस्थेचा अध्यक्ष/सचिवांनी सोप्या पध्दतीने सभासदांना बँक व्यवहाराची माहिती द्यावी. बँक अधिकाऱ्यांनी देखील सभासदांना समजेल अशी कर्जाची सुटसुटीत पध्दत अवलंबिल्यास योग्य होईल. म्हणजे सभासदांना बँकेच्या कर्ज पध्दतीची व्यवस्थित माहिती होऊन ते वेळेवर कर्जफिड करण्यास प्रवृत्त होतील.

४. ग्रामीण कारागिर संस्थेच्या सभासदांच्या उत्पादित मालाची विक्री शक्यतो संस्थेनेच करावी, म्हणजे उत्पादित माल विक्रीसाठी सभासदांना बाजारपेठेच्या विवंचनेत हिंडावे लागणार नाही. मालविक्रीची हमी सोसायटीने घेतल्यास सभासदांचे श्रम व वेळ वाया न जाता त्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळू शकेल.

५. क्षेत्रीय अधिकारी/बँक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी व्यवसायांना भेटी देऊन, पाहणी करुन व्यवसायधारकांना त्यांच्या अडीअडचणीबाबत मार्गदर्शन केल्यास लाभार्थींनी घेतलेल्या कर्जाचा योग्य तऱ्हेने वापर होण्यास मदत होईल.

६. लाभार्थ्यांना देण्यात येणारी यंत्रे, साहित्य, अवजारे यांची दुरुस्ती किंवा देखभाल याबाबत लाभार्थींना पुरेशी माहिती नसते. त्यामुळे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी भेटीच्या वेळी याबाबत त्यांना योग्य ते मार्गदर्शन केल्यास ते यंत्रसामुग्रीची नीट देखभाल व वेळीच दुरुस्त करुन व्यवसायात गती आणू शकतील. यंत्रसामुग्रीचा लाभ मिळाल्यानंतरही जी युनिटस कार्यान्वित झालेली नाहीत. त्या युनिटसला क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी भेटी देऊन लाभधारकांच्या व्यावसायिक तसेच आर्थिक अडचणींबाबत

सूचना/मार्गदर्शन करुन सदरील बंद असलेली युनिटस पुन्हा कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

७. महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत लाभार्थींना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या प्रमाणात वाढ करण्यसात यावी. खादी व ग्रामोद्योग मंडळ, धुळेच्या योजनांतर्गत सन १९९२-९३ व १९९३-९४ या आर्थिक वर्षात आदिवासी लाभार्थींच्या लक्ष्यांकापेक्षा जास्त उदिष्टयपूर्ती झालेली आहे तर जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालय गडचिरोली अंतर्गत सन १९९२-९३ व १९९३-९४ या वर्षात आदिवासी लाभार्थ्यांच्या लक्ष्याकांनुसार उदिष्टयपूर्ती झालेली नाही. यासाठी आदिवासी लाभार्थींचे प्रमाण वाढविण्यासाठी योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांनी अधिक प्रयत्न करणे गरजेचे वाटते.

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय (न्युक्लिअस बजेट योजना) संबंधी सूचना**

१. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी दिलेल्या योजनांचा अर्धवट लाभ घेऊन बंद पडलेल्या व्यवसायधारकांच्या व्यवसायांना कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी भेटी देऊन त्यांना मार्गदर्शन करुन बंद व्यवसाय पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२. एकाच गांवात एका व्यवसायासाठी एकापेक्षा जास्त लाभधारकांना अनुदान किंवा वस्तुलाभ देतेवेळी संबंधित अधिकाऱ्याने लाभधारकांच्या उत्पन्नावर मर्यादा पडणार नाही याची दक्षता घ्यावी. तथापि अशा व्यवसायधारकांच्या उत्पादित मालासाठी बाजारपेठ उपलब्ध झाल्यास ही समस्या सुटू शकेल. ज्या ठिकाणी शिलाई यंत्रे वाटप करण्यात आलेली आहेत. अशा ठिकाणी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या गणवेष शिलाईचे काम लाभधारकांना (प्रायोगिक तत्वावर) दिल्यास त्यांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होऊ शकेल.

काही व्यवसाय उदा.घड्याळ दुरुस्ती, भाजीपाला विक्री वगैरे इत्यादी व्यवसायांना बाजारपेठेतील मोक्याची जागा व्यवसायासाठी मिळणे आवश्यक आहे. कारण अशा ठिकाणी जास्त ग्राहक मिळून व्यवसायात अधिक उलाढाल होण्यास वाव असतो.

६. 'न्युक्लिअस बजेट योजने' अंतर्गत योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांचे प्रमाण मर्यादित असल्याने प्रकरणांचा निपटारा लवकर होण्यास मदत होते. 'न्युक्लिअस बजेट ' मधील योजना हया प्रामुख्याने अनुदानाच्या योजना असल्याने या योजनेस आदिवासी लाभार्थ्यांचा प्रतिसाद चांगला आहे. तथापि, व्यवसायाचे स्वरुप पाहून या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचे प्रमाण वाढविण्यात यावे, म्हणजे लाभधारकांना आपल्या व्यवसायात जास्त आर्थिक गुंतवणूक करुन स्वयंरोजगाराद्वारे स्वत:चा आर्थिक विकास साधता येईल.

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

## आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी तरुणांनी स्वयंरोजगारांतर्गत स्विकारलेल्या उत्पन्न निर्मितीच्या योजनासंबंधीचा मूल्यमापन अहवाल

### प्रपत्र-१ - लाभार्थींसाठी प्रश्नावली

### चौक क्र.१ प्रास्ताविक माहिती

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | लाभार्थ्यांचे संपूर्ण नांव | : | | | | |
| | | | वाडी/पाडा :- | | गांव :- | |
| | | | तालुका :- | | जिल्हा :- | |
| २. | लिंग | : | स्त्री | | पुरुष | |
| ३. | आदिवासी जमातीचे नांव | : | | | | |
| ४. | व्यवसाय सुरु झाला त्यावेळचे वय | : | | | | |
| ५. | वय सध्याचे | : | वर्षे | ३५ वर्षाचे आत | | ३५ वर्षावरील |
| ६. | शिक्षण | : | | | | |
| ७. | विवाहित/अविवाहित | : | | | | |
| ८. | विवाहित असल्यास एकूण मुले | : | मुले | | मुली | |
| ९. | लाभार्थी आदिवासी तरुणांव्यतिरिक्त घरातील इतर माणसांची संख्या | : | स्त्री | पुरुष | एकूण | |

### चौक क्र.२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ह्या व्यवसायाचा लाभ मिळण्यापूर्वीचा व्यवसाय | : | प्रमुख व्यवसाय :- | | |
| | | | दुय्यम व्यवसाय :- | | |
| २. | शेती (असल्यास) | : | जमीन प्रकार | एकर | गुंठे |
| | | | कोरडवाहू | | |
| | | | बागायत | | |
| | | | पडीक | | |
| | | | एकूण | | |
| ३. | बागायत असल्यास पाण्याची सोय | : | नदी/नाला/विहिर/धरण/कॅनॉल | | |
| ४. | लाभार्थ्यांव्यतिरिक्त घरातील इतर कमावत्या व्यक्तींची संख्या | : | | | |
| ५. | स्वयंरोजगार योजनेचा लाभ मिळविण्यापूर्वीचे कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न | : | | | |
| ६. | लाभार्थी/कुटुंब दुर्बल दारिद्य रेषेखालील आहे काय ? | : | होय/नाही | | |

## चौक क्रमांक-२

### जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, आदिवासी विकास महामंडळ, प्रकल्प कार्यालय, आदिवासी विकास प्रकल्प यांचे अंतर्गत असणाऱ्या व्यवसायाबाबत माहिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | जि.उ.कें./म.रा.खा.ग्रा.मंडळ/आ. वि.महामंडळ/प्र.का.ए.आ.वि.प्र.यांचे मार्फत सुरु केलेल्या व्यवसायाचें नांव | : | | | |
| २. | अर्ज केल्याचे वर्ष व प्रत्यक्ष व्यवसाय सुरु झाल्याचे वर्ष महिना इ. | : | | | |
| ३. | व्यवसायासाठी मिळालेल्या रक्कमेचा तपशील | : | | | |
| **अ. क्र.** | **रक्कम मिळालेल्या कार्यालयाचे नांव** | **कर्ज रुपये** | **अनुदान रुपये** | **आर्थिक सहाय्य रुपये** | **इतर** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| ४. | या व्यवसायासाठी तुमचा आर्थिक सहभाग असल्यास रक्कम रुपये | : | | | |
| ५. | अर्ज केल्यानंतर किती दिवसांनी व्यवसायासाठी पैसे मिळालेत | : | | | |
| ६. | व्यवसायासाठी पैसे मिळण्यास उशीर झाला असे आपणास वाटते का ? असल्यास कोणत्या कार्यालयाकडून व विलंबाची कारणे | : | होय/नाही | | |
| ७. | व्यवसाय सुरु झाल्यानंतर किती दिवसांनी कर्ज वसूलीस सुरवात झाली. हा कालावधी कर्ज वसूलीची सुरुवात करण्यास योग्य वाटतो की विलंबाने कर्जवसुली व्हावी, असे वाटते | : | | | |
| ८. | कर्ज परतफेडीची मुदत व कर्जाचा व्याजासह मासिक/त्रैमासिक/वार्षिकहप्ता रुपये | : | | | |

## चौक क्रमांक-४ योजनेविषयी इतर माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | व्यवसायासाठी आलेला एकूण खर्च (प्रकल्प खर्च रुपये) | : | |
| २. | या योजनेंतर्गत लाभ वस्तु स्वरुपात मिळावा की, रक्कमेच्या स्वरुपात मिळाला ? वस्तुस्वरुपात असल्यास त्याची उपयुक्तता वस्तु/यंत्र सद्यस्थिती काय आहे ? | : | |
| ३. | या योजनेची माहिती आपणास कोणत्या स्त्रोताद्वारे मिळाली | : | नातेवाईक/मित्रांकडून/अधिकाऱ्यांकडून/जाहिरातीद्वार/अन्य |
| ४. | आपण उद्योगधंदा सुरु केल्याने घरच्या माणसांना जास्तीचे काम मिळाले का ? किती माणसांना | : | होय/नाही |
| ५. | बाहेरची माणसे कामासाठी घेतली असल्यास संख्या | : | |
| ६. | व्यवसाय/रोजगार सुरु करतांना कोणत्या अडचणी आल्या | : | १. जागेची<br>३. कच्च्या मालाची कमतरता<br>२. वीजेची<br>४. चालू/खेळते भांडवल<br>५. कार्यालयीन अडचणी<br>६. व्यावसायिक अडचणी<br>७.अन्य |
| ७. | त्या अडचणी कशा सोडविल्यात ? | : | |
| ८. | व्यवसायासाठी जागेची उपलब्धता | : | घरातल्या घरात/स्वतंत्र जागा/स्वतंत्र वर्कशॉप/भाड्याची जागा |
| ९. | वस्तु निर्मितीचा व्यवसाय असल्यास कच्च्या मालाची उपलब्धता | : | स्थानिक जंगले/बाहेरुन विकत घेणे/टाकाऊ वस्तुपासून/अन्य |
| १० | उत्पादित मालाची विक्रीची पध्दत विक्री कोठे होते, बाजारपेठ उत्पादन कालावधी इत्यादी | : | गांवत/तालुक्याच्या ठिकाणी/जवळपासची खेडी/जिल्हा/अन्य |
| ११ | माल विक्रीला मिळणारा प्रतिसाद | : | अल्प/मध्यम/सर्वसाधारण/चांगला/उत्कृष्ट |
| १२ | या व्यवसायामुळे तुमच्या उत्पन्नात वाढ झाली का ? किती रुपयांनी | : | होय/नाही<br>मासिक \| वार्षिक |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | वाढ झाली नसल्यास कारणे | : | १. |
| | | | २. |
| | | | ३. |
| | | | ४. |
| | | | ५. |
| १४ | व्यवसायासाठी होणारा खर्च/ मासिक/ वार्षिक | : | |
| १५ | व्यवसाय सुरु करतांना प्रशिक्षण घेतले ? असल्यास व्यवसाय प्रशिक्षणाचे नांव, कोणत्या कार्यालयाकडून, कोठे, किती दिवस व प्रशिक्षणाचे मानधन | : | |
| १६ | व्यवसाय प्रशिक्षणाचा उपयोग किंवा उपयोग झाला नसल्यास त्याची कारणे | : | |
| १७ | व्यवसायासाठी प्रशिक्षण घेतले नसल्यास कारणे | : | १. प्रशिक्षणासाठी निवड झाली नाही. |
| | | | २. प्रशिक्षणाची सोय नाही |
| | | | ३. प्रशिक्षण कोठे मिळते याची माहिती नाही |
| | | | ४. प्रशिक्षण कालावधीत राहण्याची/जेवणाची सोय नाही |
| | | | ५. अपुरे मानधन |
| १८ | खाजगी/शासकीय नोकरीसाठी प्रयत्न केले होते काय ? कोणत्या वर्षी व काय प्रयत्न केलेत ? | : | होय / नाही |
| १९ | शासकीय नोकरीसाठी स्पर्धा परीक्षा-मुलाखती दिल्यात का ? त्याचा कितपत उपयोग झाला | : | होय / नाही |
| २० | व्यवसाय सुरु करावा असे का वाटले ? | : | |
| २१ | या योजनेअंतर्गत आपण स्वयंरोजगार व्यवसाय सुरु करुन लाभ घेतला, त्याप्रमाणे आपल्या भागातील इतर आदिवासी युवकांनीही या योजनेचा लाभ घेऊन व्यवसाय सुरु केला का ? | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | त्याप्रमाणे लाभ घेतला नसल्यास त्याची कारणे | : | १. |
| | | | २. |
| | | | ३. |
| | | | ४. |
| २३ | आणखी कोणकोणते व्यवसाय आपल्या भागात सुरु केले जाऊ शकतात. | : | |
| २४ | संबंधित कार्यालयाचे अधिकारी व्यवसायंना भेटी देऊन काही सूचना देतात काय ? कोणत्या सूचना देतात, भेटी कधी देतात ? तुमच्या अडचणी सोडवितात काय ? त्यांच्या सूचनामुळे व्यवसायात प्रगती/सुधारणा होण्यास वाव आहे काय | : | होय / नाही |
| २५ | नसल्यास कारणे | : | |
| २६ | स्वयंरोजगाराच्या वेगवेगळ्या योजना असतांना याच योजनेचा लाभ घ्यावा, असे आपणास का वाटले ? प्रस्तुत व्यवसायाबाबत आपण समाधानी आहात काय ? | | |
| २७ | व्यवसायाबाबत समाधानी नसल्यास कारणे | : | |
| २८ | ही योजना अधिक चांगली होण्याच्या दृष्टीने त्यात काही सुधारणा आवश्यक वाटतात काय ? असल्यास त्याबाबत अभिप्राय | : | |
| २९ | आपण सुरु केलेल्या व्यवसायाबाबत आपले स्वत:चे अभिप्राय | | |

दिनांक :

स्थळ :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

---

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी तरूणांनी "स्वयंरोजगारांतर्गत" स्विकारलेल्या (व्यवसायसेवा विभागांतर्गत) उत्पन्न निर्मितीच्या योजनांसंबंधीचा मूल्यमापन अहवाल.

---

प्रपत्र 2

---

कार्यासन अधिका-यांसाठी प्रश्नावली.

1. अधिका-याचे नाव व हुद्दा

2. कार्यालयाचे नाव, पत्ता

3. मुख्यालय

4. स्वयंरोजगाराच्या कोणत्या योजना आपल्या कार्यालयामार्फत राबविल्या जातात ?

5. आदिवासी लाभार्थ्यांना द्यावयाच्या कर्जाची/आर्थिक सहाय्य/अनुदान याची मर्यादा जास्तीत जास्त किती आहे ?

6. कार्यालयामार्फत उद्योजकांसाठी शिबीरे आयोजित केली जातात काय ? त्यांच्या उपस्थितीचे प्रमाण. होय/नाही

7. लाभार्थ्यांना लागणा-या कागदपत्रांची पूर्तता व मार्गदर्शन आपल्या कार्यालयाकडून होते का ? होय/नाही

- नसल्यास कारणे

8. अर्ज प्राप्त झाल्यानंतर साधारणत:
किती दिवसांनी कर्ज/अनुदान/आ.
सहाय्य उपलब्ध होते ? व प्रत्यक्ष
व्यवसायाला सुरवात कधी होते ?

9. व्यवसाय सुरु झाल्यानंतर आपल्या होय/नाही
कार्यालयातील कर्मचारी/अधिकारी
लाभार्थ्यांच्या व्यवसायास भेट देतात
काय ? कधी ? व मार्गदर्शन
करतात काय ? होय/नाही
कोणत्या प्रकारचे मार्गदर्शन केले जाते?

10. केंद्राकडून/कार्यालयाकडून कागदपत्रांच्या
छाननीस दिरंगाई होऊन प्रकरण मंजूरीस
विलंब लागतो काय ? होय/नाही
- विलंबाची कारणे -

11. कागदपत्रांची दिरंगाई कमी होण्यासही
कोणती उपाययोजना करावीशी वाटते ?

12. शासनाने लाभार्थ्यांचे लक्ष्यांक ठरवून
दिले असल्यास त्याप्रमाणे उद्दीष्ट साध्य
होते काय ? होय/नाही

| अ. क्र. | वर्ष | बिगर आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक | साध्य | आदिवासी लाभार्थ्यांचे लक्ष्यांक. | साध्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|

13. त्याप्रमाणे उद्दीष्टे साध्य होत
नसल्यास कारणे :-

14. शासनाच्या करांबाबत माहिती
{विक्रीकर/आयकर वगैरे}
व माल विक्रीची पध्दत.

15. लाभधारकांच्या वार्षिक उत्पन्नात
वाढ झाली असे आपणांस वाटते का? होय/नाही
होत असल्यास कितीने ?

16. उत्पन्नात वाढ होत नसल्यास
त्याची तुमच्या मते कारणे -

17. स्वयंरोजगार योजनेसाठी पुरेशा
प्रमाणात आदिवासी युवक उपलब्ध
होतात काय ? होय/नाही
नसल्यास कारणे -

18. स्वयंरोजगार योजनेत जास्तीत
जास्त आदिवासींना सामावून
घेण्याच्या दृष्टीने काय करणे
आवश्यक आहे असे आपणांस वाटते.

19. आपण राबवत असलेल्या या
स्वयंरोजगाराच्या योजनांना आदिवासींचा
मिळणारा प्रतिसाद कसा आहे ? अल्प/मध्यम/जास्त
जास्त/कमी प्रतिसादाची कारणे.

20. आपल्या जिल्हयात स्वयंरोजगार
मिळणारे आणखी कोणते व्यवसाय सुरु
करता येऊ शकतील ? {जिल्हयाची
भौगोलिक स्थिती, वनसंपत्ती इ. गोष्टी
गृहित धरुन}

21. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना
व्यवसायाचे प्रशिक्षण आवश्यक
वाटते काय ? होय/नाही
असल्यास किती कालावधीचे व
कोणाकडून दिले गेले पाहिजे.

22. व्यवयाय/रोजगारसंख्येत दरवर्षी वाढ होते किंवा नाही. होत असल्यास किती टक्क्यांनी — होय/नाही

| वाढ टक्केवारी | रोजगारवाढीची टक्केवारी | |
|---|---|---|
| 92-93. | 93-94 | 94-95 |
| | | |

23. व्यवसाय निवडीसाठी आपणाकडून काही विशिष्ठ मार्गदर्शन, सूचना दिल्या जातात काय ? किंवा सर्व्हेक्षण केले जाते काय ? — होय/नाही

असल्यास ----------> कोणत्या ?

24. स्वयंरोजगार योजना अधिक उपयुक्त होण्याच्या दृष्टीने या योजनेत तुम्हांला काय बदल/शिफारस करावीशी वाटते ?

**25. काही विशेष सूचना असल्यास -**

दिनांक :

ठिकाण :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

---

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी तरूणांनी स्वयंरोजगारातंर्गत स्विकारलेल्या (व्यवसायसेवा विभागांतर्गत) उत्पन्न निर्मितीच्या योजनांसंबंधीचा अहवाल.

---

प्रपत्र 3

---

बँक अधिकारी/वित्तसंस्था यांचेसाठी प्रश्नावली.

1. अधिका-याचे/कर्मचा-याचे नाव :

2. हुद्दा :

3. बँकेचे/वित्तसंस्थेचे नाव व पत्ता :

4. मुख्य कार्यालय :

5. स्वयंरोजगारांच्या कोणत्या योजनांसाठी आपणांकडून आदिवासी लाभार्थ्यांना कर्ज दिले जाते ?

6. आदिवासी लाभार्थ्याला जास्तीत जास्त किती रकमेपर्यंत कर्ज देता येते ? (कर्ज मर्यादा) :

7. कर्ज दिल्यानंतर किती दिवसांनी कर्जाची वसूली करण्यास सुरवात होते ? सदर कालावधी कर्जाच्या वसुलीची सुरवात करण्यास पुरेसा आहे काय ? : होय/नाही

8. कर्जाचा व्याजाचा दर व व्याजासहित कर्जाचा मासिक/त्रैमासिक/वार्षिक हप्ता रक्कम रुपये. :

9. कर्जाची परतफेडीची मुदत :

10. कर्जासाठी तारण किंवा लाभार्थ्यांचा स्वतःचा सहभाग आहे काय? : होय/नाही
असल्यास - किती ? :

20. आदिवासी लाभधारकांसाठी कर्जफेडीची विशेष सवलत आहे काय ? : होय/नाही
नसल्यास अशी कोणती सवलत देता येईल ?

21. स्वयंरोजगार कर्जासाठी पुरेशा प्रमाणात आदिवासी लाभधारक (किंवा शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे) मिळतात काय ? : होय/नाही

- पुरेशा प्रमाणात मिळत नसल्यास त्याची काय कारणे असू शकतात ?

22. या योजनेतील कर्ज प्रकरणे किंवा या योजनांसाठी आदिवासी लाभार्थ्यांचा प्रतिसाद कसा आहे ? : अल्प/मध्यम/चांगला
- प्रतिसाद कमी असल्यास वाढविण्यासाठी काय प्रयत्न आवश्यक वाटतात ?

दिनांक :

ठिकाण :-